राष्ट्रहिताय संस्कृतम्

कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः
रामटेकम्

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक), बेंगलुरु द्वारा B++ श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल २०१७-२०१८

हार्दिकम् अभिनन्दनम्!

''तेजसा सह जातानां वयः कुत्रोपयुज्यते ।''

कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बेंगलुरूचे प्रभारी कुलगुरू, न्यायशास्त्राचे विद्वान, प्रोफेसर श्रीनिवास वरखेडी यांची कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या कुलगुरूपदी मा. राज्यपाल श्री. सी. विद्यासागर राव यांनी नियुक्ती केली. प्रो. वरखेडी यांनी दि. १४ डिसेंबर २०१७ रोजी कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारला. कुलगुरूपदाचे नियुक्ती पत्र मा. राज्यपाल महोदयांकडून स्वीकारताना प्रो. वरखेडी.

वेदाचार्य घैसास गुरूजी वेदपाठशाळा, पुणे यांच्यातर्फे कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाला प्राचीन ज्ञानशाखांच्या, वेदवाङ्मयादींच्या अध्ययन-अध्यापन-संशोधनकार्यासाठी ''कै. विनायकभट्ट घैसास गुरूजी सरस्वती उपासना पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार विद्यापीठातर्फे प्रभारी कुलगुरू मा. डॉ. प्रमोद येवले यांनी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या पूर्व कुलगुरू मा. डॉ. उमा वैद्य यांच्या शुभहस्ते स्वीकारला. याप्रसंगी रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. सिद्धार्थविनायक काणे, पुण्याच्या महापौर मा. सौ. मुक्ता टिळक, मा. श्री. मोरेश्वर घैसास, मा. श्री मुकुंद चितळे प्रामुख्याने उपस्थित होते. दि. १/११/२०१७

Hon'ble Shri C. Vidyasagar Rao

Governor of Maharashtra
and
Chancellor of Universities in Maharashtra

संदेश

समानो मन्त्रः समितिः समानी। (ऋग्वेद – १०.१९१.३)

रामटेक हे महाकवी कालिदासाच्या 'मेघदूतम्' या खंडकाव्यामुळे जगत्पटलावर सुप्रसिद्ध आहे. कालिदासाच्या यक्षाने रामगिरीवरून मेघाद्वारे संदेश पाठविला होता. कालिदासाची ह्या रसपरिप्लुत काव्यरचनेने केवळ कालिदासालाच नव्हे तर रामटेकनगरीलाही चिरायु कीर्ती प्राप्त करून दिली आहे. अशा निसर्गरमणीय आणि भगवान रामचन्द्राच्या पदस्पर्शाने पवित्र स्थळी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे मुख्यालय आणि शैक्षणिक परिसर आहे.

प्राचीन शास्त्रपरंपरेचे संरक्षण व संवर्धन (Sanskrit for Future) यासाठी विश्वविद्यालय कटिबद्ध आहे. त्या दृष्टिनेच रामटेक येथे गुरुकुल परंपरेने पारंपरिक अभ्यासक्रम शिकविले जात आहेत. विश्वविद्यालयाच्या विस्तार सेवा मंडळाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात संस्कृत भाषेचा प्रचार-प्रसार करण्याचे तसेच अधिकाधिक लोकांपर्यंत संस्कृत पोहचावे (Sanskrit for All) या ध्येयाने प्रेरित होऊन विविध संस्कृत कार्यशाळांचे आणि प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येत आहे. वारंगा येथे विश्वविद्यालयाला आंतरराष्ट्रीय ज्ञान केंद्राची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याद्वारे संस्कृतभाषेतील प्राचीन ज्ञानाचा आधुनिक युगातील शास्त्रांशी/ज्ञानाशी मेळ घालून आंतरविद्याशाखीय संशोधनाचे कार्य (Tradition for Innovation) करण्यात येणार आहे. अशा प्रकारे विश्वविद्यालयाचा हा 'ज्ञानप्रदीप' रामटेक, नागपूर आणि वारंगा या तीनही ठिकाणी प्रदीप्त होऊन संस्कृतज्ञानप्रसाराचे कार्य करीत आहे. या पार्श्वभूमीवर सत्र २०१७-१८ चा विश्वविद्यालयाचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना मला आनंद होत आहे. विश्वविद्यालयाची शैक्षणिक, संशोधन, पायाभूत सुविधा आणि अन्य प्रशासकीय स्तरांवर झालेली प्रगती आणि विकासाकडे होत असलेली दमदार वाटचाल याचा आढावा या अहवालाद्वारे घेण्यात आला आहे. या अहवालातील काही मुद्दे अधोरेखांकित करून नोंदवणे मला महत्त्वाचे वाटते.

- महाराष्ट्र शासनाद्वारे नागपूर जवळ वारंगा येथे विश्वविद्यालयाला ५० एकर जागा प्राप्त झाली असून त्याचे भूमिपूजन संपन्न झाले.
- रामटेक येथील शैक्षणिक भवन आणि वसतिगृहाचे कार्य पूर्ण होवून ते विश्वविद्यालयाने ताब्यात घेतले आहे. तसेच दीक्षांत सभागृहाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
- रामटेक आणि आसपासच्या परिसरातील युवा विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन मिळावे आणि त्यांना मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी मिळावी यासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली. तसेच नेट/सेट मार्गदर्शन केंद्रही सुरू करण्यात आले.
- विश्वविद्यालयाच्या परीक्षा विभागाचे नागपूरहून रामटेक येथील मुख्यालयात स्थानांतरण करण्यात आले. परीक्षासंबंधित सर्व महत्त्वाचे आणि गोपनीय सर्व कार्य रामटेक येथून सुरू झाले आहे.
- वेदपाठशाळांना विश्वविद्यालयाचे संलग्नीकरण देऊन तेथे शिकणा-या विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयाद्वारे पदविका/पदवी प्रमाणपत्रे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन, विश्वविद्यालयाने प्राचीन ज्ञानपरंपरेचे संरक्षण व संवर्धन करण्याचे व्रत जोपासले आहे.
- प्राचीन ज्ञानशाखांचा अर्वाचीन विज्ञान व तंत्रज्ञान आणि विषयांशी समन्वय करून त्याद्वारे विश्वविद्यालयीन छात्रांना नवनवीन अध्ययन व संशोधन संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून विश्वविद्यालयाद्वारे रिसर्च फॉर रिसर्जन्स फाऊंडेशन नागपूर, कर्नाटक संस्कृत विद्यापीठ बेंगलुरू आणि एमआयटी स्कूल ऑफ वैदिक स्टडीज्, पुणे यांच्याशी सामंजस्य करार करून, त्याद्वारे विविध संशोधन विषयक कार्यक्रम राबविले जात आहेत.
- विश्वविद्यालयातर्फे संशोधक छात्रांना संशोधनवृत्ती देण्यात येणार आहे.
- विश्वविद्यालयाच्या दोन संशोधन प्रकल्पांना राष्ट्रीय संस्कृत संस्थानद्वारे मान्यता प्राप्त झाली आहे.
- महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत संस्कृत शिक्षण आणि विश्वविद्यालयाचे कार्य प्रसृत व्हावे यासाठी विस्तार सेवा मंडळाचे पुनर्गठन करून सरलमानक संस्कृत कार्यशाळांचे आयोजन करून महाराष्ट्रातील संस्कृतप्रेमींचे आणि संस्कृत कार्यकर्त्यांना सम्मीलित करण्याचे कार्य सुरू झाले आहे.
- विश्वविद्यालयाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुयश हे विश्वविद्यालयासाठी भूषणावह आहे. युवा विद्यार्थ्यांच्या आणि अध्ययनशील प्राध्यापकांच्या संस्कृत अध्ययन-संशोधनकार्याद्वारेच या विश्वविद्यालयाचा कीर्तिपरिमल सर्वदूर पसरेल हा मला विश्वास आहे.

अशाप्रकारे विश्वविद्यालयाची शैक्षणिक, सांस्कृतिक, संशोधन, प्रशासन अशा विविध टप्प्यांवरील विकासाचा आलेख या अहवालात विशद करण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच विश्वविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संवैधानिक अधिकारी, प्रशासकीय सहकारी यांच्या एकत्रित प्रयत्नातून विश्वविद्यालय निरंतर प्रगतीपथावर जाईल हा विश्वास मला वाटतो.

जयतु संस्कृतम्। जयतु भारतम्।

प्रो. श्रीनिवास वरखेडी
कुलगुरू

राष्ट्रहिताय संस्कृतम्

Vision

Sanskrit for future

Mission

Sanskrit for all

Research focus

Tradition for Innovation

प्रतिज्ञा

भारतः मम देशः। सर्वे भारतीयाः मम बान्धवाः। भारत देशे अहं स्निह्यामि। अस्य देशस्य याः समृद्धाः विविधाश्च परंपराः ताः प्रति मम शिरः अभिमानेन उन्नतं भवति। तासां परम्पराणाम् अनुगमनं कर्तुम् ताः आसादयितुं च अहं सदा प्रयतिष्ये।

अहं पितरौ गुरून् वयोज्येष्ठान् प्रति च आदरेण वर्तेय। सर्वान् प्रति सौजन्येन व्यवहरेयम्। अहं मम राष्ट्रेण देशबान्धवैश्च सह एकान्तनिष्ठम् आचरणं करोमि इति प्रतिजाने। तेषां कल्याणे समुत्कर्षे च मम आत्यन्तिकं सौख्यं विनिहितम् अस्ति।

जयतु संस्कृतम्। जयतु भारतम्।

सत्र २०१७-१८ या अहवाल कालावधीत सन्माननीय कुलगुरू पदाचा पदभार सांभाळलेले माननीय कुलगुरू

मा. डॉ. उमा वैद्य

कुलगुरू
कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
कार्यकाल दि. ११/१/२०१३ ते १८/९/२०१७

मा. डॉ. प्रमोद येवले

प्रभारी कुलगुरू
कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
कार्यकाल दि. १९/९/२०१७ ते १३/१२/२०१७

नवनियुक्त कुलगुरू

हार्दिकम् अभिनन्दनम्!

मा. प्रो. श्रीनिवास वरखेडी

कुलगुरू, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
कार्यकाल प्रारंभ – दि. १४ डिसेंबर २०१७ पासून...

हार्दिक अभिनंदन!

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या सन्माननीय पूर्वकुलगुरू डॉ. उमा वैद्य यांना २०१७ या वर्षासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे संस्कृत क्षेत्रातील अतुलनीय कामगिरी बद्दल ''राष्ट्रपती पुरस्कार'' जाहीर झाला. तसेच प्रो. वैद्य यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदस्यपदी आणि इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज्, सिमला या ख्यातनाम संशोधन संस्थेच्या विद्वतसमितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रो. वैद्य यांच्या संस्कृत क्षेत्रातील विद्वत्तेचा हा गौरव आहे, आणि विश्वविद्यालयासाठी हे निश्चीतच अभिमानास्पद आहे. विश्वविद्यालयातर्फे प्रो. उमा वैद्य यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

हार्दिक अभिनंदन!

प्रो. मधुसूदन पेन्ना, अधिष्ठाता, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय यांची व्हँकुवर (कॅनडा) येथे संपन्न झालेल्या १७ व्या जागतिक संस्कृत परिषदेत सहभागी होण्यासाठी जाण्याऱ्या विशेष शिष्टमंडळात निवड झाली.
हे शिष्टमंडळ मा. श्री. प्रकाश जावडेकर, केंद्रीय मंत्री, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या नेतृत्वाखाली सहभागी झाले होते.

राष्ट्रहिताय संस्कृतम्

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय

रामटेक

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक), बेंगलुरु द्वारा

B + + श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल

2017 —18

(अहवाल कालावधी – दि. 1 मे 2017 ते 30 एप्रिल 2018)

Kavikulaguru Kalidas Sanskrit University

Ramtek Office : Administrative Building, Mauda Rd., Ramtek 441 106 Dist. - Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No.: (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No.: (0712) 2560992 Fax : (0712) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email : kksuregistrar1997@gmail.com

कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, रामटेकम्

वार्षिक अहवाल

ANNUAL REPORT

(2017-2018)

Committee

Prof. Madhusudan Penna	-	Chairperson
Prof. Anagha Ambekar	-	Member
Mrs. Kalyani Deshkar	-	Member
Dr. Renuka Bokare	-	Member & Secretary

Published by
Registrar
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Coverpage - Paper 300 gsm.

Paper - Maplitho 80 gsm. / Art Paper 130 gsm.

Size - A4

Printed at :
Shree Hrishikesh Enterprises
Nagpur - 440012

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
Ramtek Office : Administrative Building, Mauda Rd., Ramtek 441 106 Dist. - Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No.: (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No.: (0712) 2560992 Fax : (0712) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email : kksuregistrar1997@gmail.com

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक	
	मराठी	इंग्रजी
• **मा. कुलगुरूंचे मनोगत**		
• **संस्कृतविषयी...**	5	
• **विश्वविद्यालयाविषयी.....**	6	6
• **व्यवस्थापन परिषद् सदस्य**		8
• **विद्वत्परिषद् सदस्य**		9
• **विद्यापीठ नियोजन विकास मंडळ सदस्य**		10
• **परीक्षा मंडळ सदस्य**		11
• **विश्वविद्यालयातील विविध कक्ष/समिती**	12	
प्रकरण पहिले — विभागनिहाय अहवाल		
वेद तथा व्याकरण विभाग	13	85
संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग	17	89
भारतीय दर्शन विभाग	23	95
वेदांग ज्योतिष विभाग	29	101
शिक्षणशास्त्र विभाग	33	105
प्रकरण दुसरे — विस्तार सेवा अहवाल		
राष्ट्रीय सेवा योजना	35	107
हस्तलिखित केंद्र	40	110
छात्र कल्याण	41	111
क्रीडा विभाग	42	112
मराठी भाषा गौरव दिन	45	

प्रकरण तिसरे — प्रशासकीय अहवाल

आस्थापना विभाग	48	113
विद्या विभाग	53	121
विद्यापीठ नियोजन विकास मंडळ	55	124
महाविद्यालयीन कक्ष	65	135
वित्त विभाग	66	136
अभियांत्रिकी विभाग	67	137
परीक्षा विभाग	72	141
ग्रंथालय व प्रकाशन विभाग	73	142

- **विश्वविद्यालयातील विशेष उपक्रम आणि उपलब्धी** 154

संस्कृतविषयी.....

संस्कृत ही भारताच्या अनमोल ठेवा असणाऱ्या प्राचीन ज्ञानभांडाराच्या ज्ञानप्राप्तीची एकमेव व म्हणूनच अतिशय महत्त्वपूर्ण भाषा आहे. संस्कृत म्हणजे ज्ञानवारसा संक्रमित, संरक्षित व संवर्धित करणारी भाषा! . प्राचीन काळीही नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशी नावाजलेली विद्यापीठे भारतात होती. या विद्यापीठांद्वारेच पाणिनी, पतंजली, कौटिल्य यांच्यासारखे स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या, ग्रंथकर्तृत्वाच्या जोरावर चिरायु कीर्ती मिळवणारे विद्वान निर्माण झाले. हा अभिमानास्पद व तेजोमय ज्ञानवारसा जतन व वृद्धिंगत करण्यासाठी संस्कृत भाषेचे अध्ययन करणे अनिवार्य आहे. म्हणूनच संपूर्ण भारतात संस्कृतचा प्रचार, प्रसार व्हावा याकरिता एकूण 17 संस्कृत विश्वविद्यालये कार्यरत आहेत.

भारतातील संस्कृत विश्वविद्यालये

- संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तरप्रदेश)
- श्री जगन्नाथ संस्कृत विश्वविद्यालय, पुरी (ओरिसा)
- राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, तिरुपती (आंध्र प्रदेश)
- **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक(महाराष्ट्र)**
- श्री शंकराचार्य संस्कृत विश्वविद्यालय, कालडी(केरळ)
- लालबहादूर शास्त्री संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- कामेश्वर संस्कृत विश्वविद्यालय, दरभंगा(बिहार)
- राष्ट्रिय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली
- जगद्गुरू रामानंद आचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपूर (राजस्थान)
- सोमनाथ संस्कृत विश्वविद्यालय, गुजरात
- महर्षी पाणिनी संस्कृत विश्वविद्यालय, उज्जैन(मध्यप्रदेश)
- उत्तराखंड संस्कृत विश्वविद्यालय, हरिद्वार(उत्तराखंड)
- कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बंगलोर (कर्नाटक)
- कुमार भास्कर वर्मा संस्कृत व प्राचीन शिक्षा विद्यापीठ, नालबारी (आसाम)
- वेंकटश्वर वैदिक विद्यापीठ, तिरुपती (आंध्रप्रदेश)
- महर्षी वाल्मिकी संस्कृत विश्वविद्यालयए हरयाणा.
- कलकत्ता संस्कृत महाविद्यालय, कोलकाता.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी महाराष्ट्रात संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांच्या सततच्या आग्रहाने व प्रेरणेने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय श्री. सुधाकरराव नाईक यांनी ज्ञानयोगी स्वर्गीय डॉ. श्रीकांत जिचकार यांची एक सदस्यीय समिती गठित करून संस्कृत विश्वविद्यालयाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. जिचकार यांनी भारतातील सर्व विश्वविद्यालयांचे अध्ययन करून शासनाला एक विस्तृत अहवाल सादर केला.

सदर अहवालाच्या अनुषंगाने व इतर शिक्षणशास्त्रतज्ज्ञांच्या अभ्यासाधारे महाराष्ट्र शासनाने दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी नागपूर जिल्हयातील रामटेक येथे महाकवी कालिदासाच्या चिरस्मरणार्थ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना केली. महाकवी कालिदासाच्या अभिधानाने स्थापन झालेले हे महाराष्ट्रातील एकमेव संस्कृत विश्वविद्यालय असून या विश्वविद्यालयाला संपूर्ण भारतात व भारताबाहेर शैक्षणिक संस्थांना संलग्नीकरण देण्याचा अधिकार आहे.

The former Prime Minister of India, Hon’ble Shri P.V. Narasimha Rao is a great scholor of Sanskrit, always insisted that Maharashtra has a great tradition of Sanskrit learning hence it should have an independent University. With his encouragement late Chief Minister of Maharashtra Hon’ble Shri Sudhakarraoji Naik took up the issue and appointed Dr. Shrikant Jichkar as one man committee to give a study report for establishing the Sanskrit University in Maharashtra. Dr. Jichkar prepared the study report and non-Formal University Act for the establishment of Sanskrit University in Maharashtra.

The Government of Maharashtra took up the issue and appointed a committee comprising of Sanskrit scholors and other educationists. On the basis of the report of the committee the State Government established the Sanskrit University at Ramtek and named it as Kavikulaguru Kalidas Sanskrit University. The University was established on 18th September 1997. The place Ramtek, which is a township in Nagpur district, was selected because it is connected to the name of great poet of the world Kavikulaguru Kalidas. This is the only Sanskrit University in Maharashtra. This university has right to give affiliation to other Educational Institutes within India & ouside the India.

संकाय

Sankayas (Faculties)

वेद–विद्या संकाय

Faculty of Vedavidya

संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय

Faculty of Sanskrit & other languages

भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय

Faculty of Indian Religion, Philosophy & Culture

प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे संकाय

Faculty of Ancient Indian Science & Humanities

शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय

Faculty of Education & Miscellaneous Faculties

शैक्षणिक विभाग

Teaching Departments

वेद तथा व्याकरण	Dept. of Veda & Vyakarana
संस्कृत भाषा तथा साहित्य	Dept. of Sanskrit Language & Literature
दर्शनशास्त्र	Dept. of Darshanshastra
योगशास्त्र	Dept. of Yogashastra
वेदांग ज्योतिष	Dept. of Vedanga Jyotisha
ललितकला	Dept. of Fine Arts
मानव्यशास्त्रे	Dept. of Humanities
शिक्षणशास्त्र	Dept. of Education
ग्रंथालय वार्ताशास्त्र	Dept. of Library & Information Science
संकीर्ण विद्या	Dept. of Miscellaneous Subjects

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Management Council

Sr. No.	Name	Position
1	**Prof. Shrinivasa Varakhedi,** Hon'ble Vice-Chancellor, KKSU, Ramtek	Chairman
2	**Vacant**	Member
3	**Dr. Nanda J. Puri,** Dean, faculty of Sanskrit and other Languages KKSU, Nagpur	Member
4	**Dr. Kamal Singh,** Hon'ble Vice-Chancellor, SGBAU, Amravati	Member
5	**Shri Ashish Deshmukh,** MLA	Member
6	**Shri. Niranjan V. Dawkhare**, MLC	Member
7	**Principal Secretary,** Higher Education	Member
8	**Joint Director,** Higher Education	Member
9	**Dr. Harekrishna Agasti,** HoD, Department of Veda Vyakarana, KKSU, Nagpur.	Member
10	**Dr. Bhau Dandade,** Principal, CISFA, Nagpur	Member
11	**Dr. Kavita S. Holey,** HoD, Sanskrit Bhasha & Sahitya Department, KKSU, Nagpur.	Member
12	**Vacant**	Member
13	**Dr. Krishnakumar Pandey,** Dean, Ancient Indian Sciences and Humanaties, KKSU, Nagpur.	Member
14	**Dr. Indumati Bharambe,** HoD, Education Department, KKSU, Nagpur.	Member
15	**Dr. Vijaykumar C.G.,** Director, Board of Planning and Development, KKSU, Ramtek.	Member
16	**Dr. Aravind D. Joshi,** Registrar, KKSU, Ramtek.	Member Secretary
17	**Dr. R. J. Joshi,** Finance & Accounts Officer, KKSU, Ramtek.	Member
18	**Dr. Umesh D. Shivhare,** Controller of Examination, KKSU, Ramtek.	Member

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Academic Council

SN.	Name	Position		SN.	Name	Position
1	**Prof. Shrinivasa Varakhedi,** Hon'ble Vice-Chancellor, KKSU, Ramtek	Chair person		10	**Dr. Lalita Chandratre**, Dean, faculty of Education and Miscellaneous, KKSU, Nagpur	Member
2	**Dr. Devendra Chaugule,** 202, Krushana Plaza, In front of R.C.F. colony, Vaishvi Nivas, Alibag, Dist Raigarh – 402 209	Member		11	**Dr. Dilip Dabir,** Vaidadarbhiya Harikirtan Sanstheche Kirtan Mahavidyalaya, Rajat Mahostsav, Dharmpeth Mulanchi Shala, Dharmpetha, Nagpur	Member
3	**Dr. Anjali Rahatgaonkar,** Joint Director, (Higher Education), Nagpur	Member		12	**Dr. Bhau Dandale,** 64, Sambhaji Nagar, Near Trimurti Nagar, Ring Road, Nagpur (Mob. 9423072562)	Member
4	**Dr. Kusum Patoria,** Azad Chowk, Sadar, Nagpur – 440001	Member		13	**Dr. Dipak Kapade,** Librarian (Acting), Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
5	**Dr. Leena Rastogi,** 86 Madhav Nagar, Nagpur -10	Member		14	**Shri. Satish Naidu,** C/o – Dr. Mukund Shastri, Plot No. 115, Bajiprabhu Nagar, Nagpur.	Member
6	**Dr. C.G.Vijaykumar,** Dean, Faculty of Vedvidya, KKSU, Nagpur	Member		15	**Dr. B. R. Sharma,** G.S.College of Yoga and Cultural Synthesis, Kaivalyadham B. R. Sharma, G.S.College of Yoga and Cultural Synthesis, Kaivalyadham yoga institute, Swami Kuwalayanand marg] Lonavala, Distt. Pune	Member
7	**Dr. Nanda J. Puri,** Dean, faculty of Sanskrit and other Languages KKSU, Nagpur	Member		16	**Dr. Indumati Bharmbe,** Co-ordinator, Internal Quality Assurance Cell, KKSU, Nagpur	Member
8	**Dr. Madhusudan Penna,** Dean, faculty of Indian Religion, Philosophy and culture, KKSU, Nagpur	Member		17	**Dr. Kavita Holey,** Director, Vistar Seva Mandal, KKSU, Ramtek	Member
9	**Dr. Krishnakumar Pandey,** Dean, faculty of Ancient Indian Science and Humanities, KKSU, Nagpur	Member		18	**Dr. Aravind Joshi,** Registrar, KKSU, Ramtek	Secretary

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Planning and Development (BPD)

Sr. No.	Name	Position
1.	**Prof. Shrinivasa Varakhedi,** Hon'ble Vice-Chancellor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Chairperson
2.	**Dr. Nanda Puri,** Associate Professor & Dean Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
3.	**Dr. Madhusudan Penna,** Associate Professor & Dean Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
4.	**Dr. Kalapani Agasti,** Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
5.	**Prof. Anagha Ambekar,** Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
6.	**Dr. Balchandra Khandekar,** 152, Metta Laghu Vetan colony, Kamptee road, Nagpur	Member
7.	**Dr. Sharada Gadge,** HoD Sanskrit Dept., LAD college Shankar nagar, Nagpur.	Member
8.	**Dr. Dnyaneshwar Kulkarni,** 215, Siddhi Vinayak, North Bazar road, Gokulpeth Nagpur.	Member
9.	**Dr. Vibha Kshirsagar,** Plot no. 12, Ganesh colony, Rana pratap nagar, Shriram Urban Bank, ring road, Nagpur.	Member
10.	**Dr.Vijaykumar C.G.** Director (I/c), Board of planning and Development Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Secretary

Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Board of Examination

Sr. No	Name	Position
01	**Prof. Shrinivasa Varakhedi,** Hon'ble Vice-Chancellor Kavikulaguru Kaldas sanskrit University Ramtek	Chairman
02	**Prof. Nanda Puri** Dean, Faculty of Sanskrit & Other Languages Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
03	**Prof. Madhusudan Penna** Dean, Faculty of Indian Religion, Philosophy & Culture Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
04	**Prof. C.G. Vijaykumar** Dean, Faculty of Ved Vidya Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
05	**Prof. Krishnakumar Pandey** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
06	**Prof. Lalita Chandratre** Dean, Faculty of Education and Sankirna Vidya shakha Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
07	**Dr. Hrushikesh Dalai**, Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
08	**Dr. Shivram Bhatt**, Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
09	**Hon'ble Joint Director** (Higher Education) Nagpur Division, Nagpur	Member
10	**Dr. Umesh Shivhare** Controller of Examination Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member-Secretary

विश्वविद्यालयातील
विविध कक्ष/समिती

अ.क्र.	समिती/कक्ष	अध्यक्ष/विभागप्रमुख/समन्वयक
1.	व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष	प्रा. डॉ. इंदुमती भारंबे
2.	अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष	प्रा. डॉ. इंदुमती भारंबे
3.	सेवायोजना व मार्गदर्शन कक्ष	प्रा. डॉ. इंदुमती भारंबे
4.	रॅगिंग प्रतिबंधक कक्ष	डॉ. नंदा पुरी
5.	लैंगिक छळ प्रतिबंधक कक्ष	डॉ. नंदा पुरी
6.	छात्रप्रवेश समिती	डॉ. नंदा पुरी
7.	विस्तार सेवा मंडळ	डॉ. कविता होले / प्रो. कृष्णकुमार पांडेय
8.	महिला कक्ष	डॉ. कीर्ती सदार
9.	पूर्व छात्र संघटन	डॉ. कलापिनी अगस्ती
10.	विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष (ऑनलाईन)	डॉ. कलापिनी अगस्ती
11.	राष्ट्रीय सेवा योजना कक्ष	डॉ. हरेकृष्ण अगस्ती
12.	हस्तलिखित स्रोत केन्द्र	डॉ. प्रसाद गोखले
13.	शारीरिक शिक्षण विभाग	डॉ. हृषिकेश दलाई
14.	छात्र कल्याण कक्ष	डॉ. राजश्री मेश्राम
15.	महिला तक्रार निवारण समिती	प्रा. अनघा आंबेकर
16.	आचार्य पदवी कक्ष	डॉ. दीपक मेश्राम
17.	शिष्यवृत्ती सेवा कक्ष	सौ. माधुरी येवले

वार्षिक अहवाल

मराठी

प्रकरण पहिले

विभागनिहाय अहवाल

वेद तथा व्याकरण विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – वेदविद्या संकाय

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. शास्त्री, आचार्य तथा विद्यावारिधी इ. (वैदिक साहित्य, व्याकरणशास्त्र)

अधिष्ठाता – प्रो. डॉ. विजयकुमार सी. जी.

विभाग प्रमुख – डॉ. हरेकृष्ण अगस्ती, सहयोगी प्राध्यापक

सहायक प्राध्यापक – डॉ. शिवराम भट्ट, डॉ. जयवंत चौधरी

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 13

उद्देश –

- प्राचीन वैदिक साहित्याचे अध्ययन–अध्यापन व संशोधन करणे.
- आधुनिक विज्ञान वा अन्य शाखांशी वैदिक साहित्याचे आंतरविद्याशाखीय अध्ययन व संशोधन करणे.
- वेदांगांचे अध्ययन व संशोधन करणे.
- व्याकरणशास्त्राचे पारंपरिक गुरूकुल पद्धतीने अध्यापन व संशोधन करणे.
- शास्त्रांचे संरक्षण, संवर्धन व नवीन पिढीत संक्रमण करणे.
- संस्कृत संभाषण शिबीरांच्या माध्यमातून संस्कृत भाषेचा प्रचार, प्रसार करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- नव्य आणि प्राचीन व्याकरणावर आधारित संशोधनास प्रोत्साहन देणे.
- संस्कृत व्याकरणाच्या दुर्मीळ हस्तलिखितांचे विद्यावारिधी पदवीसाठी संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.
- विभागातील प्राध्यापकांचे महद् संशोधन प्रकल्पासाठी योगदान.
- गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी तज्ज्ञ विद्वज्जनांची व्याख्याने पीएच्.डी संशोधनासाठी आयोजित करणे.
- व्याकरणाचे शास्त्रीय ग्रंथ इ–पुस्तक स्वरूपात उपलब्ध करवून देणे.
- आंतरविद्याशाखीय संशोधनास प्रोत्साहन देणे.
- वर्तमानयुगातील गरजा लक्षात घेवून संशोधनक्षेत्रातील अद्ययावत ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने संशोधक छात्रांसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे.

विभागनिहाय अहवाल

वेद तथा व्याकरण विभाग

1) संस्कृत संभाषण वर्ग :–

दिनांक 10.07.2017 ते 19.07.2017 पर्यंत

विद्यार्थी व जनसामान्यांमध्ये संस्कृतभाषेविषयी रुची निर्माण आणि संभाषण कौशल्य संपादन करावे या हेतूने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे दिनांक 10 ते 19 जुलै 2017 या कालावधीत निःशुल्क संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या संभाषण वर्गाचे उद्घाटन भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक, संस्कृतप्रेमी तसेच राष्ट्रिय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ता मा. मंगेश जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. दिनांक 10.07.2017 रोजी विश्वविद्यालयाच्या नागपूर येथील शैक्षणिक परिसरात संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन सत्रात अध्यक्षस्थानी वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता तसेच विद्यापीठाचे बी.पी.डी. संचालक? **डॉ. विजयकुमार सी.जी.** हे उपस्थित होते. संभाषण वर्गाचे समन्वयक तसेच वेद तथा व्याकरण विभागाचे प्राध्यापक **डॉ. हरेकृष्ण अगस्ती** उपस्थित होते. उद्घाटनसत्राच्या आरंभी डॉ. अगस्ती यांनी संभाषण वर्गाच्या आयोजनाची उद्दिष्टे प्रास्ताविका द्वारे स्पष्ट केली. संभाषण वर्गाचे उद्घाटक **श्री. मंगेश जोशी** यांनी संस्कृत अध्ययनाने संस्कृती आणि संस्कारांचे जतन होते असे प्रतिपादन केले. संस्कृत भाषेत उपलब्ध वैज्ञानिकतत्त्व जगातील ज्येष्ठ वैज्ञानिकांना आकृष्ट करीत असल्याचे सांगितले. संस्कृत शिवाय भारतीयता अशक्य आहे असे मत त्यांनी मांडले. संस्कृत भाषेतील तत्त्वे आत्मसात केल्यास सर्व समस्यांचे समाधन अनायास मिळू शकते असे मत डॉ. विजयकुमार सी.जी. यांनी अध्यक्षीय भाषणात प्रतिपादित केले. जीवनात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली संस्कृत भाषेत आहे. म्हणून या भाषेचे अध्ययन आणि अध्यापन होणे काळाची गरज आहे. युवा विद्यार्थी संस्कृत भाषेच्या अध्ययनाने स्वतःचे उत्तम व्यक्तिमत्व निर्माण करू शकतात असे मत मा. अध्यक्षांनी मांडले. उद्घाटन सत्राचे संचालन व आभार वेद तथा व्याकरण विभागाचे सहायक प्राध्यापक **डॉ. शिवराम भट्ट** यांनी मानले.

संस्कृत संभाषण वर्गात नागपूरातील विविध महाविद्यालयांमधून एकूण 97 विद्यार्थी तसेच काही संस्कृतप्रेमी नागरिक सहभागी झाले होते. दहा दिवस हा वर्ग रोज दु. 12.00 ते 02.00 या वेळेत आयोजित करण्यात आला होता. वर्ग शिक्षक म्हणून वेद तथा व्याकरण विभागातील श्री.रूपेश रुद्रकार व श्रीवरदा माळगे या दोन विद्यार्थ्यांनी सहभागींना मार्गदर्शन केले. संभाषण कौशल्य अधिगत होण्यासाठी संस्कृत भाषेचा विविध प्रयोग, विभक्तींचे योग्य नियोजन, दैनंदिन व्यवहारात येणारे शब्द, संवादकौशल्य, वाक्यरचना, संस्कृत गीते वर्णोच्चारण पद्धती, सुभाषित पठण, भगवद्गीता पठण इत्यादी विविध विषयांवर, विद्यार्थ्यांचे संभाषणविषयी कौशल्य तसेच आत्मविश्वास वाढविण्यासाठी या वर्गशिक्षकांनी परिश्रम घेतले. विश्वविद्यालयाच्या तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे विविध शास्त्रीय विषयांवर विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले.

संस्कृत संभाषण वर्गाचे समापन दिनांक 19.07.2017 रोजी आयोजित करण्यात आले होते. समापन कार्यक्रमात प्रमुखातिथी म्हणून नागपुरातील प्रसिद्ध संस्कृतानुरागी तसेच संस्कृत भारतीचे नागपूर प्रान्तीय सहमंत्री **श्री. श्रीनिवास वर्णेकर** हे उपस्थित होते. संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी स्वतःचा वेळ द्यायला हवा,

असे आवाहन करुन संस्कृत संभाषण वर्गाचे निःशुल्क आयोजन तसेच संभाषणाची स्वतःपासून केलेली सुरुवात ही या भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी मोठी सेवा होईल असे मत त्यांनी मांडले. विद्यार्थीदशेत भाषाविषयक ज्ञान तसेच संभाषण कौशल्य संपादित केल्यास आजचा विद्यार्थीवर्ग भविष्यात या भाषेचा उत्तरोत्तर उन्नतीसाठी सक्षम होवू शकेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात काम करत असलो तरी संस्कृतभाषेतून मिळालेला संस्कार नेहमी उत्कर्षाकडे घेऊन जातो असे मत अध्यक्षीय भाषणात भारतीय धर्म,तत्त्वज्ञान व संस्कृती संकायाचे अधिष्ठाता **डॉ. मधुसूदन पेन्ना** यांनी मांडला. संस्कृत भाषा आपल्याला मिळालेली वारसा आणि या वारसाचे जतन करणे आपला धर्म आहे म्हणून या भाषेबद्दल आपल्या मनात प्रेम असावा असे प्रतिपादन डॉ. पेन्ना यांनी केले. दशदिनात्मक संभाषणवर्गाचा अहवाल तसेच प्रास्ताविक संभाषण वर्गाचे समन्वयक **डॉ. हरेकृष्ण अगस्ती** यांनी सादर केले. संभाषण वर्गात सहभागी विद्यार्थ्यांनी मनोगत प्रकट केले. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व चोख नियोजनामुळे दहा दिवसांचा संस्कृत संभाषण वर्ग यशस्वीपणे पार पडला.

2) ग्रन्थप्रदर्शनी :–

दिनांक 15.09.2017 रोजी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे ग्रंथालय विभागाच्या मदतीने ग्रंथप्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. वेद व व्याकरणसंबधी सर्व ग्रंथ प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आले होते. या ग्रन्थप्रदर्शनीचे उद्घाटन क.का. संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व वेद तथा व्याकरण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सी.जी.विजयकुमार यांच्या हस्ते झाले. सर्व संकायांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक व वेद तथा व्याकरण विभागाचे सर्व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. एम.ए. संस्कृत वेद व व्याकरण शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनीचा लाभ घेतला.

एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या प्रथम वर्षाच्या एक एक विद्यार्थ्याचा गट तयार करून त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आलेल्या पुस्तकांच्या तपशिलाचे संकलन करण्याची सूचना देण्यात आली. तसेच एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या द्वितीय वर्षाच्या एक एक विद्यार्थ्यांचा गट तयार केला होता. त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवलेल्या पुस्तकांच्या आधारे एका ग्रंथाचे किती टीका व टीकाकार आहेत याची माहिती संकलित करण्यास सांगण्यात आले. सूचनेप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी हे कार्य सुचारुरित्या संपन्न केले.

3) विद्यार्थी सहभाग :

वेद तथा व्याकरण विभागातील एम.ए. विद्यार्थ्यांनी इन्द्रधनुष्य, आविष्कार, तिरुपति छात्र प्रातिभ समारोह, महाराष्ट्र प्रान्तीय राज्यस्तरीय शास्त्रीयस्पर्धा, नाटकस्पर्धा, संक्रमणोत्सव, संस्कृत सप्ताह इ. शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला व पुरस्कार आणले. ते खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्रप्रान्तीय राज्यस्तरीय शास्त्रीय स्पर्धा राष्ट्रीय संस्कृत संस्थानाच्या क.जे. सोमय्या संस्कृत विद्यापीठ, मुम्बईतील दिनांक 17.11.2017 रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या.

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाकडून विविध शास्त्रीय स्पर्धांमध्ये एकूण 09 (05 विद्यार्थी व 04 विद्यार्थिनी) विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांसोबत 02 मार्गदर्शक (डॉ. शिवराम भट्ट व डॉ. कलापिनी अगस्ती) पाठविण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त पणे सहभाग घेऊन खालील प्रमाणे यश प्राप्त केले.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	स्पर्धा	पुरस्कार	विभाग	वर्ग
01	**श्रीवरदा माळगे**	व्याकरणशलाका	**प्रथम**	व्याकरण	एम्.ए.संस्कृत द्वि.वर्ष
02	**परीक्षित झोडेकर**	वेदान्तशलाका	**प्रथम**	दर्शन	एम्.ए.संस्कृत द्वि.वर्ष
03	**अनुज शर्मा**	ज्यौतिषशलाका	**प्रथम**	वे.ज्योतिष	बी.ए.वे.ज्योतिष तृ.वर्ष
04	**वेदश्री आर्वीकर**	साहित्यशलाका	**द्वितीय**	साहित्य	एम्.ए.संस्कृत प्र. वर्ष
		शास्त्रीयस्फूर्तिस्पर्धा	**द्वितीय**		
05	**अद्वैत आर्वीकर**	भगवद्गीताकण्ठपाठ	**प्रथम**	साहित्य	आगम पदविका
06	**देवेश्वर आर्वीकर**	अष्टाध्यायीकण्ठपाठ	**प्रथम**	साहित्य	बी.ए.विशारद प्र. वर्ष
07	**गौरी सोनटक्के**	साहित्यभाषण	**द्वितीय**	साहित्य	एम्.ए.संस्कृत द्वि.वर्ष
08	**वैष्णवी दाभेकर**	धर्मशास्त्रभाषण	**प्रथम**	साहित्य	एम्.ए.संस्कृत द्वि.वर्ष
09	**रूपेश रुद्रकार**	वेदभाष्यभाषण	**प्रथम**	व्याकरण	एम्.ए.संस्कृत प्र. वर्ष

अशाप्रकारे सात विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक व दोन विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

तिरुपती येथील राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाद्वारे ''अखिल भारतीय संस्कृत छात्रप्रातिभ समारोहा''चे आयोजन दि. 31 जानेवरी 2018 ते 03 फेब्रुवरी 2018 या दरम्यान करण्यात आले होते. या राष्ट्रस्तरीय स्पर्धामध्ये 10 शास्त्रार्थ स्पर्धा, 05 सांस्कृतिक स्पर्धा व अन्त्याक्षरी, समस्यापूर्ती, रसप्रश्न स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या विविध स्पर्धांपैकी वेदभाषण मध्ये **रूपेश रुद्रकार**, यांनी प्रोत्साहनपर पुरस्कार, प्राविधिक स्पर्धेमध्ये **श्रीवरदा माळगे** यांनी द्वितीय पुरस्कार, एकपात्राभिनय स्पर्धेमध्ये **गौरी सोनटक्के** यांनी द्वितीय पुरस्कार व लोकनृत्य स्पर्धेमध्ये **श्रीवरदा माळगे, वृषाली दाणी, प्रज्ञा करकरे, दिव्याणी अनमोलवार, नयना भारसाकळे, परीक्षित झोडेकर, अनुज शर्मा, देवेश्वर आर्वीकर** यांनी द्वितीय पुरस्कार प्राप्त केला.

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय

अभ्यासक्रम – 1 आगम संस्कृत, 2 आगम प्राकृत, 3 बी.ए. संस्कृत विशारद, 4 शास्त्री, 5 आचार्य, 6 एम्. ए., 7 एम्. फिल्., 8 विद्यावारिधी, 9 पीएच्. डी., 10 डी. लिट्. इ. (संस्कृत साहित्यशास्त्र तथा काव्यशास्त्र)

अधिष्ठाता – प्रो. डॉ. नंदा पुरी

विभाग प्रमुख – प्रो. डॉ. कविता होले

सहायक प्राध्यापक – डॉ. पराग जोशी, डॉ. राजेंद्र जैन

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 21

उद्देश –

- प्राचीन संस्कृत साहित्य, भाषा यांचे अध्यापन, संशोधन
- आंतरविद्या शाखीय व तौलनिक अध्यापन, संशोधनास प्रोत्साहन
- संस्कृत भाषा जनसामान्यांपर्यंत, संस्कृतानुरागींना सहज आत्मसात करता यावी यासाठी विशेष आगम, विशारद इ. अभ्यासक्रमांचे अध्यापन
- संस्कृतसह अन्य प्राचीन भाषा प्राकृत, पाली इ. भाषांचे अभ्यासक्रम जिज्ञासूंना उपलब्ध करवून देणे.
- संस्कृतसह जर्मन, फ्रेंच इ. विदेशी भाषांचे पदविका अभ्यासक्रम चालविणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- समकालीन संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र
- आंतरविद्याशाखीय संशोधन
- मार्गदर्शकांसह संशोधकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे
- संशोधक विद्यार्थ्यांकरिता एकदिवसीय रिसर्च मीट दर दोन महिन्यांनी आयोजित करणे

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील पदव्युत्तर संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा तसेच विभागाद्वारे राबविलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल –

1) कालिदास दिवस समारोह –

'आषाढस्य प्रथम दिवसें' अर्थात् आषाढाचा पहिला दिवस हा महाकवी कालिदास दिन म्हणून सुपरिचित आहे. संस्कृत प्रेमींसाठी विशेष स्मरणीय आहे. शनिवार दि. 24 जून 2017 रोजी कालिदास दिनानिमित्त विश्वविद्यालयाच्या रामटेक येथील मुख्यालयातील प्रांगणात असलेल्या महाकवी कालिदासांच्या स्मारकाला कुलगुरु डॉ. उमा वैद्य यांनी पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली. विश्वविद्यालयाचे रामटेक येथील सर्व कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या वर्षी आषाढ हा संध्याकाळी सुरू होत असल्याने कालिदासाला अभिवादन करण्यासाठी त्याला भेटण्यासाठी जणू सूर्यप्रकाश अचानक लुप्त होऊन, आकाशात काळ्या मेघांनी दाटी केली. मा. कुलगुरु डॉ. वैद्य यांनी या सुंदर क्षणांच्या साक्षीने महाकवी कालिदासाच्या पुतळयाला अभिवादन केले.

2) संस्कृत सप्ताह व संस्कृत दिन उत्सव –

संस्कृत वाङ्मयाच्या प्रचार व प्रसाराकरिता विश्वविद्यालयात संस्कृत सप्ताह उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. या वर्षी हा संस्कृत सप्ताह दि. 05.08.2017 ते दि. 12.08.2017 या कालावधीत आयोजित करण्यात आला. या अनुषंगाने क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे संस्कृत सप्ताहांतर्गत विविध स्पर्धांचे व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. 05.08.2017 रोजी संस्कृत सप्ताहाच्या निमित्ताने रामटेक येथील कालिदास स्मारकास भेट देण्यात आली. मा. अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी यांनी सर्व विद्यार्थ्यांना कालिदास स्मारक व कालिदास साहित्याची माहिती करवून दिली. दि.07.08.2017 रोजी आंतर महाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नागपुरातील अनेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राप्त निबंधांचे मूल्यांकन साहित्य विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ.कविता होले यांनी केले. त्याचप्रमाणे दि.08.08.2017 रोजी आंतर महाविद्यालयीन संस्कृत ललित गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व मधुर गायन या स्पर्धेचे वैशिष्ट्य होते. या स्पर्धेस डॉ. नंदा पुरी व वेदांग ज्योतिष विभागाचे डॉ. दिनकर मराठे निर्णायक म्हणून उपस्थित होते. दि. 09.08.2017 रोजी संस्कृत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेस व्याकरण विभागाचे डॉ. हरेकृष्ण अगस्ती निर्णायक रूपाने उपस्थित होते. या संस्कृत सप्ताहाचा समारोप कार्यक्रम दि. 11.08.17 रोजी मा. कुलगुरु डॉ.उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेत पार पडला. या प्रसंगी डॉ. चंद्रगुप्त वर्णेकर, सचिव, संस्कृत भाषा प्रचारिणी सभा, यांचे 'संगणकीय संस्कृतम्' या विषयावर विशेष व्याख्यानही आयोजित केले होते. या प्रसंगी मा. अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी व समन्वयिका डॉ. कविता होले उपस्थित होत्या. सर्व पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना पुरस्कारांचे व प्रमाणपत्रांचे वितरण या प्रसंगी करण्यात आले.

3) प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर व्याख्यानमाला

डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरु केलेल्या व्याख्यानमालेतील पहिल्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेचा शुभारंभ डॉ. वर्णेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून करण्यात आला. विदर्भाच्या मातीत जन्मलेल्या आणि विदर्भच नव्हे तर संपूर्ण भारतात आपल्या प्रासादिक संस्कृत रचनेने आणि सरळ सोप्या परंतु अभिजात संस्कृत वाणीने अधिराज्य गाजविणाऱ्या डॉ. वर्णेकरांविषयी आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. संस्कृत, संगीत आणि संघ या तीन सकारांचा ध्यास घेणाऱ्या आणि या तीन क्षेत्रांसह योगक्षेत्रालाही वाहून घेणाऱ्या डॉ. वर्णेकरांना संस्कृत महाकाव्ये, नाटके आणि अनेक स्फुटरचना आणि खंडकाव्यांची रचना केली आहे. नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर संस्कृत विभागाचे अध्यक्षपद भूषविण्यासह अनेक नामांकित संस्थांचे पदाधिकारी, मार्गदर्शक म्हणून ते कार्यरत होते. अशा नागपूर नगरीचे भूषण असलेल्या डॉ. वर्णेकर व्याख्यानमालेतील पहिले पुष्प नागपूरच्या प्रख्यात संस्कृत विदुषी डॉ. लीना रस्तोगी यांनी मंगळवार दि. 12 सप्टेंबर 2017 रोजी गुंफले. प्रज्ञाभारतींचे विविधांगी व्यक्तित्व या विषयावर डॉ. रस्तोगी यांचे व्याख्यान झाले. डॉ. रस्तोगी यांनी वर्णेकर यांच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचे पदर उलगडून दाखविले. त्यांच्या प्रासादिक व सरल वैदर्भी शैलीतील भाषेतील प्रभुत्वाने प्रभावित होवून शंकराचार्य जयेंद्र सरस्वती यांनी त्यांना 'प्रज्ञाभारती' अशी उपाधी दिली, असे त्यांनी सांगितले.

मा. कुलगुरु उमा वैद्य म्हणाल्या, ''लेखकांच्या व्यक्तिमत्वावर झालेले संस्कार हे साहित्य कृतीमधून प्रकट होत असतात व त्याचा प्रत्यय डॉ. वर्णेकरांच्या वाङ्मयातून येतो''. विद्यापीठाच्या मा. कुलगुरू उमा वैद्य यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. कुलसचिव मा. डॉ. अरविंद जोशी तसेच, संस्कृत तथा संस्कृतेतरभाषा संकायाच्या अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी यांची विशेष उपस्थिती होती. या व्याख्यानाला संस्कृतानुरागी, संस्कृत अभ्यासक, डॉ. वर्णेकर प्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पराग जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन समन्वयिका डॉ. कविता होले यांनी केले.

4) युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळा –

मराठी भाषा गौरव पंधरवाड्यान्तर्गत दि. 26.02.2018 रोजी संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे युनिकोड प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मधुसूदन पेन्ना, अधिष्ठाता, भारतीय तत्त्वज्ञान तथा संस्कृति संकाय हे उपस्थित होते. अध्यक्षस्थान डॉ. नन्दा पुरी, अधिष्ठाता संस्कृत भाषा तथा संस्कृतेतर भाषा संकाय यांनी भूषविले.

सर्वांना संगणकावर अतिशय सोप्या पध्दतीने मराठीतून टंककलेखन करता यावे यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. कविता होले, सहयोगी प्राध्यापक, संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग या होत्या, तर सहसमन्वयक विश्वविद्यालयाचे तांत्रिक सहायक श्री. राजीवरंजन मिश्रा हे होते. या कार्यशाळेत 65 प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. डॉ. कविता होले व श्री. राजीवरंजन मिश्रा यांनी प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

5) प्राकृत आगम पदविका अभ्यासक्रम निमित्ताने प्राकृतातील चंपूकाव्यावर विशेष व्याख्यान –

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठात 'प्राकृत भाषेतील चंपूकाव्यवाङ्मय' या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाअंतर्गत संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्राकृत भाषा व साहित्याच्या अध्ययन–अध्यापन व संशोधनाला चालना मिळावी तसेच प्राकृत भाषेतील साहित्याचा परिचय व्हावा हा या आयोजनमागील हेतू. मिरज महाविद्यालय, मिरज येथील डॉ.रायगोंडा पाटील यांनी या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता व विभाग प्रमुख डॉ. नंदा पुरी होत्या. डॉ. कविता होले यांची विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ. होले यांनी व्याख्यानामागची भूमिका विशद केली. डॉ. पाटील यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे प्राकृत भाषेचे स्वरूप स्पष्ट करुन प्राकृत भाषेतील चंपूकाव्यवाङ्मयाचा गोषवारा घेतला. अध्यक्षा डॉ. नंदा पुरी यांनी प्रमुख अतिथींच्या भाषणाचा आढावा घेतला.

तसेच चंपूकाव्याचा इतिहास व वैशिष्ट्ये स्पष्ट केली. कार्यक्रमाचे संचालन व संयोजन डॉ. राजेंद्र जैन यांनी केले. डॉ. पराग जोशी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध संकायाचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

6) प्राकृतभाषा व साहित्यविषयक विशेषव्याख्यान–

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या संस्कृतभाषा तथा साहित्यविभागाद्वारे भारतीय साहित्याच्या प्रचार–प्रसाराच्या दिशेने भारतीय प्राचीन भाषांमध्ये संस्कृतप्रमाणेच प्राकृत पाली इत्यादी भाषासाहित्याचा अभ्यास होण्याच्या हेतूने दरवर्षी नवनवीन विषयांवर व्याख्याने आयोजित केली जातात. विभागात सुरू असणाऱ्या आगम पदविका प्राकृत या अभ्यासक्रमाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2017–18 च्या अंती दि.13.03.18 रोजी ''**नाट्यवाङ्मयातील प्राकृतभाषिकपात्रे, अभिनय व नाट्यसौन्दर्य**'' या विषयावर विशेषव्याख्यानाचे आयोजन व विद्यार्थ्यांचे सौप्रस्थानिक आयोजिले होते.

विशेषव्याख्यानाचे अध्यक्षपद मा. कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी यांनी भूषविले होते. कार्यक्रमास विशेषव्याख्याता म्हणून डॉ. नंदा पुरी तर प्रमुखातिथी म्हणून डॉ.लीना रस्तोगी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात प्राकृतातील सरस्वतीवंदनेने झाली. डॉ. राजेंद्र जैन यांनी द्वारे वार्षिक इतिवृत्त कथन व प्रास्ताविक केले. अभ्यासक्रमातील ठराविक विद्यार्थ्यांचे मनोगत व्यक्त करण्यात आले तसेच अभ्यासक्रमात अध्यापन करण्याऱ्या प्राध्यापक डॉ. शिवराम भट्ट व डॉ. राजेंद्र जैन यांचा सत्कार मा. कुलगुरू यांनी केला. प्रमुखातिथी डॉ. लीना रस्तोगी प्राकृत भाषेच्या अध्ययनाची गरज स्पष्ट केली. डॉ. नंदा पुरी यांनी नाट्यशास्त्रातील उद्धरणांसह नाटकातील प्राकृतभाषिक पात्रांचे महत्व विशद करत नाटयसौन्दर्य स्पष्ट केले. मा. कुलगुरुंनी अध्यक्षीय भाषणाद्वारे प्राकृत अध्ययनाकरिता चालना देण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. राजेंद्र जैन यांनी केले होते. कार्यक्रमात विद्यापीठाचे सर्व प्राध्यापकगण तसेच विद्यार्थीगण उपस्थित होते. एकात्मता मन्त्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

7) मराठी भाषा दिवस व पंधरवडा –

कवी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाद्वारे दरवर्षी 27 फेब्रुवारी 2018 रोजी मराठी भाषागौरव दिन साजरा केला जातो. याच अनुषंगाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दरवर्षी मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन विविध उपक्रम राबवून उत्साहात केले जाते. या वर्षी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने क.का.सं. वि. द्वारे दिनांक. 21.02.2018 रोजी मराठी भाषेतील स्वरचित कवितांचे कवी संमेलन हिंदी मोरभवनच्या 'अर्पण' सभागृहात आयोजित केले होते. मा. कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन झाले. सदर कविसंमेलनात विदर्भातील विख्यात पंचभाषा कवयित्री मा. आशाताई पाण्डे, संस्कृत विदुषी डॉ.लीनाताई रस्तोगी व रामटेकचे ज्येष्ठ साहित्यिक व कवी श्री. श्रीराम अष्टनकर यांनी विशेषत्वाने आपल्या कविता प्रस्तुत करून सहभाग घेतला. तसेच रामटेक येथील श्री. जगदीश गुजरकर, श्री. पवन कामडी, नागपुरचे श्री. चारुदत्त अघोर, सौ. तृप्ती नवारे, डॉ. प्रगती वाघमारे, डॉ. पराग जोशी या युवा कवींनी आपल्या कविता प्रस्तुत केल्या. याचबरोबर नवोदित कवी क. का.सं.वि. चे मा. वित्त व लेखाधिकारी डॉ. रामचंद्र जोशी यांनीही आपल्या कवितेने सर्वांना मोहित केले. या कविसंमेलनात महाकवी डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी आपल्या संस्कृत कवितेद्वारे सर्वांना मार्गदर्शन दिले. कविसंमेलनाचे अध्यक्षस्थान विश्वविद्यालयाच्या मा. अधिष्ठाता व ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. नंदा पुरी यांनी भूषविले. श्रृंगार, विनोद, व्यथा, चिंतन, अभंग व तत्त्वज्ञानावर आधारित कविता प्रस्तुत करून सर्व कवींनी कविसंमेलनास बहुरंगी आयाम प्राप्त करून दिला. विश्वविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, विभाग प्रमुख, अधिकारी व विद्यार्थी यांनी कविसंमेलनाचा आस्वाद घेतला. सूत्रसंचालन डॉ. पराग जोशी यांनी केले.

8) विश्वविद्यालय स्थापना दिवस व विभागीय ग्रंथ प्रकाशन –

विश्वविद्यालयाचा स्थापना दिवस दि. 18 सप्टेंबर रोजी तत्कालीन मा. कुलगुरु डॉ. उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेत पार पडला. याच कार्यक्रमाचे औचित्य साधत विश्वविद्यालयाच्या साहित्य विभागाच्या वतीने बी.ए. विशारद (पंचम व षष्ठ सत्र) अभ्यासक्रमाकरिता वाग्विलास(तृतीय मुद्रा) पाठयपुस्तकाचे निर्माण करण्यात आले होते. याचे या प्रसंगी मा. कुलगुरूंच्या तसेच संकाय प्रमुख डॉ. नंदा पुरी याच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी मा. कुलगुरूंनी पाठयपुस्तक निर्माण कर्ते व संपादक मंडळ, विभागीय सर्व प्राध्यापकांचे अभिनंदन व कौतुक केले.

9)ग्रंथालय भेट –

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय व ग्रंथालयातील पुस्तकांविषयक अपेक्षित माहिती मिळण्याकरिता दि.25 जुलै 2017 रोजी ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालय भेटीने विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयातील पुस्तकांविषयक जागृती निदर्शनास आली. पुस्तकांचे आदान – प्रदान करण्याबाबत ज्ञान मिळाले.

10) शैक्षणिक सहल –

विश्वविद्यालयाच्या तसेच विभागातील विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक सहलीचे आयोजन दि. 2 जानेवारी 2018 रोजी विश्वविद्यालयीन सर्व प्राध्यापकांसमवेत करण्यात आले. नागपूर जिल्ह्यातील वेदांतव्हॅली या स्थळीशैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. सर्वांनी पर्वतारोहण, जलतरण इ. निरनिराळ्या क्रीडांचा आनंद घेतला. विशेषतः मा. कुलगुरू

डॉ. श्रीनीवास वरखेडी यांनी देखील सहलीस्थळी उपस्थित राहून सर्व विद्यार्थ्यांना व अध्यापकांना प्रोत्साहन व मार्गदर्शन केले. विभागातील बी. ए. विशारद, एम.ए. साहित्य तसेच शोधछात्रांनी बहुसंख्येने सहभाग घेतला.

11). विद्यार्थ्यांचे यश, पुरस्कार व बक्षिसे –

खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी पुरस्कार व बक्षिसे प्राप्त करुन यश संपादित केले.

1. तिरुपती छात्र प्रातिभ समारोह –

तिरुपती येथील राष्ट्रियसंस्कृतविद्यापीठात प्रतिवर्षीप्रमाणे गेल्यावर्षी दि. 30.01.2017 ते 02.02.2017 पर्यंत आयोजित झालेल्या 11व्या अखिलभारतीयसंस्कृतछात्रप्रातिभ समारोहात कु. गौरी सोनटक्के (एम्.ए.प्रथम वर्ष) हिने एकपात्राभिनय स्पर्धेत भाग घेऊन तृतीय क्रमांक व प्रमाणपत्र पुरस्कार प्राप्त केला. याच स्पर्धामधील संस्कृतगीतगानस्पर्धामध्ये प्राची भट हिला सांत्वना पुरस्कार व प्रमाणपत्र देण्यात आले. या अखिलभारतवर्षीय स्पर्धामध्ये विभागाच्या कु. माधुरी वैद्य, कु. वृषाली दाणी, कु. दिव्यानी अनमोलवार व कु. वैष्णवी दाभेकर, श्री देवेश्वर आर्वीकर या विद्यार्थ्यांनी नृत्यस्पर्धेत पारितोषिक प्राप्त केले. कु. वेदश्री आर्वीकर हिने साहित्यशास्त्र भाषण स्पर्धेत सहभाग घेतला.

2. प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर स्मृती वक्तृत्व स्पर्धा –

नागपूर येथील सी.पी. एन्ड बेरार महाविद्यालयाद्वारे दि. 23.08.2017 रोजी आयोजित आन्तरमहाविद्यालयीन वक्तृत्वस्पर्धामध्ये विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यश प्राप्त केले. संस्कृत वक्तृत्व स्पर्धेमध्ये विभागाच्या कु. गौरी सोनटक्के (एम.ए. द्वितीय वर्ष) व कु. प्रज्ञा करकरे (एम.ए. प्रथम वर्ष) ह्यांनी यशस्वी सहभाग घेतला.

3. मराठी भाषा गौरव दिन, रामटेक –

'मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' **"वक्तृत्व स्पर्धा"** रामटेक येथील विद्यासागर कला महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे समन्वयक डॉ. जयवन्त चौधरी व सहसमन्वयक विद्यासागर महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक व मराठी भाषेचे प्रगाढ अभ्यासक व प्राध्यापक डॉ. गिरीश सपाटे होते. वक्तृत्व स्पर्धेत पदव्युत्तर संस्कृत विभाग, क.का.संस्कृत विश्वविद्यालय रामटेक व रामटेक येथील ताई गोळवलकर विज्ञान महाविद्यालय, श्री. नरेन्द्र तिडके महाविद्यालय, रविकान्त रागीट प्रशासकीय महाविद्यालय, दमयन्तीताई अध्यापक महाविद्यालय इ. महाविद्यालयातील तसेच विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

स्पर्धेला विद्यापीठातील शिक्षण विभागाचे प्राध्यापक डॉ. अमोल मांडेकर व विद्यासागर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सावन धर्मापुरीवार यांनी परीक्षक म्हणून मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे डॉ. गो. सोमकुळे यांनी अध्यक्षीय भाषण केले. स्पर्धेचे सूत्रसंचालन डॉ. आशिष ठाणेकर व आभार प्रदर्शन आयुष वाटाणे यांनी कले. चहा व नाश्तांनी स्पर्धेचा समारोप झाला.

4) भारतीय संस्कृती परीक्षा स्पर्धा –

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी संस्थेच्या नागपुरशाखेच्या वतीने नागपुरातील शैक्षणिक संस्थांमध्ये भारतीयसंस्कृती परीक्षांचे आयोजन केले जाते. या वर्षी विश्वविद्यालयातील तसेच विभागातील एकूण 34 विद्यार्थी सहभागी झाले. कु. गौरी सोनटक्के, सौ. सुषमा गोखले, कु. प्रज्ञा करकरे, सौ. नंदिनी जठार, कु. ज्योती हसबनीस, कु.सोनाली महाजन, कु. वैष्णवी दाभेकर, कु.सायली पेशवे, कु.नयना भारसाकळे, या विभागीय विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग घेतला.

भारतीय दर्शन विभाग

स्थापना – वर्ष 2000

संकाय – भारतीय धर्म, तत्वज्ञान तथा संस्कृती संकाय

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. दर्शनशास्त्र आणि योगशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. डॉ. मधुसूदन पेन्ना

विभाग प्रमुख – डॉ. कलापिनी अगस्ती, सहयोगी प्राध्यापिका

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 13

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय धर्मविषयक तथ्यांचा अभ्यास करणे
- भारतीय दर्शन परंपरेचे अध्ययन व संशोधन करणे
- भारतीय आणि अन्य संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास करणे
- भारतीय व पाश्चात्त्य दर्शन तसेच तत्त्वज्ञानविषयक विचार व ग्रंथ यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- संशोधनातील गुणवत्ता राखण्यासाठी आणि वाढविण्यासाठी संशोधनाधारित कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- रूसा अंतर्गत काही संशोधन प्रकल्पांचा प्रस्ताव सादर.
- भारतीय दर्शन या अंतर्गत तसेच वेदान्त, योग–सांख्य दर्शन इ. मध्ये एम्. फिल्., आचार्य पदवीसाठी संशोधन

भारतीय दर्शन विभाग

1. **आंतरराष्ट्रीय योग दिन**
2. **योग प्रात्यक्षिक वर्ग**
3. **शास्त्रभारती अन्तर्गत विशेष व्याख्यान**
4. **आचार्य भारती –आद्यशंकराचार्य आणि भगवद्रामानुजाचार्य यांची जयंती**
5. **विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमात सहभाग**

01. आंतरराष्ट्रीय योग दिवस –दिनांक 21 जून 2017

तृतीय आंतरराष्ट्रीय योगदिनाचा कार्यक्रम भारतीय दर्शन विभागाद्वारे दिनांक 21 जून 2017 रोजी आयोजित करण्यात आला.

शासनाच्या निर्देशानुसार दिनांक 21 जून 2017 रोजी सकाळी 07.00 वा पदव्युत्तर शैक्षणिक विभागात क.का. संस्कृत विश्वविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरिता योगाभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, भारतीय धर्म तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना, मा.वित्त व लेखाधिकारी डॉ. रामचंद्र जोशी, मा. परीक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, मा. संचालक वि.नि.मं. डॉ. विजयकुमार सी.जी.यांच्यासह प्राध्यापकवर्ग, अधिकारीवर्ग, व शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. योगशास्त्र विभागातील प्रा. सुजाता द्रव्यकार यांनी विविध योगासनांची प्रात्याक्षिकांसह माहिती दिली. व उपस्थितांकडून योगाभ्यास करून घेतला.

यानंतर सकाळी 10.00 वा मधुरम सभागृह, हिंदी साहित्य सम्मेलन, मोरभवन, नागपूर येथे कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे,आयडीबीआय बँक ऑफ इंडिया, नागपूर यांच्या सहप्रायोजकत्वाने जनसामान्यांमध्ये योगविषयक जागृती करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरु डॉ. उमा वैद्य तर प्रमुख अतिथी म्हणून मा. केशव क्षीरसागर, विशेष अतिथी म्हणून आयडीबीआय बँक ऑफ इंडियाचे उपमहाप्रबंधक मा. संतोष पोतदार, विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता विभाग प्रमुख तसेच या कार्यक्रमाचे संयोजक डॉ. मधुसूदन पेन्ना व्यासपीठावर उपस्थित होते.तसेच या कार्यक्रमास विश्वविद्यालयातील सर्व संकायाचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, अधिकारी वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद, विश्वविद्यालयातील विद्यार्थी, तसेच जून 2017 मधे घेण्यात आलेल्या योगशिबिरांचे प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी व अन्य श्रोतृ वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता तसेच या कार्यक्रमाचे संयोजक डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी केले. या प्रसंगी त्यांनी विश्वविद्यालयाच्या योगविभागाद्वारे आयोजित विविध उपक्रमांचा आणि अभ्यासक्रमांचा आढावा घेतला तसेच प्राचीन योगपरंपरेचे जतन करण्यासाठी विश्वविद्यालय पूर्वीपासूनच कटिबध्द असल्याचे प्रतिपादित केले. प्रास्ताविकातच त्यांनी विविध ठिकाणी घेण्यात आलेल्या दहा योगशिबिरांचा अहवाल पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सादर केला.

त्यानंतर विश्वविद्यालयाच्या योगविभागातील विद्यार्थ्यांनी योगविषयक जनजागृती व्हावी यास्तव "योगगीत" सादर केले. त्यानंतर या विद्यार्थ्यांनी योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले. विशेषतः एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी सुनिता वधावन हिने अत्यंत कठीण अशा आसनांचे प्रात्यक्षिक सहजतेने सादर केले. त्यांच्या आसन प्रदर्शनाने व शरीर संतुलनाने उपस्थित श्रोते भारावून गेले.

योगप्रशिक्षणादरम्यान विवेक मंदिर हायस्कूल, गोंदिया येथे आयोजित प्रशिक्षण वर्गातील शालेय मुलांनी या कार्यक्रमात योगासन प्रात्यक्षिक सादर केले.

प्रात्यक्षिक प्रदर्शनानंतर कार्यक्रमाचे विशेष अतिथी आयडीबीआय बँक ऑफ इंडियाचे उपमहाप्रबंधक मा.संतोष पोतदार यांनी आपल्या भाषणात "योग ही जीवनशैली असून प्रत्येकाने तिला आपल्या दिनचर्येचा भाग बनविला पाहिजे. योगाभ्यासाने व्यक्ती अनुशासनयुक्त होवून जीवन तणावमुक्त होते". असे प्रतिपादित केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते, मा. केशव क्षीरसागर यांनी प्राचीन भारतीय परंपरा आणि संस्कृती यांचा आढावा घेत आजच्या विज्ञानयुगातही प्राचीन भारतीयशास्त्र आपले स्थान अबाधीत टिकवून आहे व विज्ञाननिष्ठ मानवाच्या जीवनाला अधिक सुखदायक व समाधानी करण्यासाठी ही शास्त्रे सक्षम आणि उपयुक्त आहेत या विषयावर आपल्या अध्ययनपूर्ण वक्तव्याने प्रकाश टाकला व संजीवन प्राणायाम पद्धतीचे मार्गदर्शन केले.

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरु यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात "संपूर्ण जगात भारतीय धर्म, संस्कृती आणि योगशास्त्राला विशेष महत्व आहे. अनेक राजकीय परंपरा आल्या आणि गेल्या परंतु भारताची अध्यात्मविद्या तीच्या अंगभूत वैशिष्ट्यांमुळे आजतागायत प्रवाहीत व टिकून आहे. प्रत्येकामध्ये असलेल्या चैतन्याचा अनुभव करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने अंतर्मुख होवून योगाभ्यास करावा असे आवाहन या प्रसंगी केले. योगाचा उल्लेख त्यांनी "रोगारि व भोगारि" अर्थात रोगांचा व भोगांचा शत्रु तो योग होय या शब्दात केला.

कार्यक्रमाच्या शेवटी योगप्रशिक्षकांना आणि प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे संचालन डॉ. पराग जोशी यांनी केले तर आभारप्रदर्शन दर्शन व येागशास्त्र विभागाच्या सहायक प्राध्यापिका डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

2. योग प्रात्यक्षिक वर्ग –

केंद्र शासनाद्वारे दिनांक 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जाहीर करण्यात आला आहे. तदनुषंगाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे सामाजिक स्तरावर योगविषयक जनजागृती करण्यासाठी एप्रिल – मे 2017 या महिन्यांमध्ये एकवीस विविध ठिकाणी समाजातील विविध घटकांसाठी 15 दिवसांचे योगशिबिर कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन तथा योगविभागाद्वारे आयोजित करण्यात आले होते. हे प्रशिक्षण शिबिर योगविभागातील खालील विद्यार्थ्यांद्वारे चालविण्यात आले.

अ.क्र	प्रशिक्षकाचे नाव	संस्था/विद्यालयाचे नाव	कालावधी	सह भागींची संख्या
01	श्री. राजेंद्र चौधरी	गोदरेज आनंदम सिटी, नागपूर	24.05.2017 ते 30.05.2017	34
02	सौ. वर्षा जांबुवंत मासुरकर	1. अबानगर, सिद्धेश्वर नगर जवळ खरबी, दिघोरी रिंग रोड, नागपूर	05.05.2017 ते 15.05.2017	10
		2 हनुमान मंदीर, मार्ग क्र.12, के.डी.के. रोड नंदनवन, नागपूर	20.05.2017 ते 25.05.2017	10
		3. आनंदम कर्नल रोड सहभाग	26.05.2017 ते 30.05.2017	
03	सौ. वैशाली चिडे	बॅ. शेषराव वानखडे विद्यानिकेतन, म.न.पा. नागपूर	01.05.2017 ते 15.05.2017	12
		मराठा सेवा संघ लॉन, भाउसाहेब सुर्वेनगर नागपूर.22	15.05.2017 ते 30.05.2017	20
04	श्री. चंद्रकांत देशमुख श्री. प्रमोद मालवे	पुंडलिक महाराज आश्रम नंदनवन आयुर्वेद ले आउट मिरची बाजार सक्करदरा नागपूर	16.06.2017 ते 20.06.2017	12
05	श्री. भरत गुप्ता सौ.सरोज गुप्ता श्री. प्रदीप गुप्ता	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रिडा प्रशिक्षण स्थळ, संत्रा मार्केट नागपूर	06.05.2017 ते 10.05.2017	20
06	कु. माधुरी वानकर	आदीलोक महिला बी.एड. महाविद्यालय, गोरेगाव	01.04.2017 ते 30.04.2017	15
		गोंदीया जिल्हा योग असोसिएशन गोंदीया	21.05.2017 ते 27.05.2017	15
		नगर परिषद गोंदिया	06.06.2017 ते 10.06.2017	15
		स्फुर्ती बहुद्देशीय संस्था वरोरा	29.05.2017 ते 04.06.2017	25
		विवेकमंदिर ज्यु. कॉलेज आणि हायस्कुल गोदीया	01.05.2017 ते 11.05.2017	15
		विवेकमंदिर सी.बी.एस.ई. शाळा, गोंदीया	12.05.2017 ते 18.05.2017	16
		मंगलम मूकबधिर शाळा गोंदीया	11.06.2017 ते 17.06.2017	15
07	सौ. ज्योती रंगारी	पद्माताई बर्धन हॉल प्रकाशनगर, खापरखेडा	01.06.2017 ते10.06.2017	15
08	सौ. शुभांगी नायब श्री. राजेंद्र चौधरी	विदर्भ को.ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन हॉल	18.11.2016 ते 21.11.2016	60

	श्री. प्रदीप गुप्ता कु. गुंजन दांडेकर सौ. संगीता आगरकर श्रीमती. रुपा व्यास सौ. निशिगंधा खंडाळकर श्री. चंद्रकांत देशमुख कु. सुनिता वधावन सौ. वर्षा मासुरकर	श्री. कौशल गुरु यांच्या आश्रमस्थळी, नागपूर अभ्यंकर नगर, नागपूर गांधीसागर गार्डन, महाल नागपूर		40 45 35
09	कु.वंदिता मेलग डॉ. निशिगंधा खंडाळकर	गृहिणी समाज, रामदासपेठ, नागपूर	18.04.2017 ते 24.04.2017	10
एकूण	**21 प्रशिक्षक**	**21 ठिकाणी**		**496**

3. शास्त्रभारती अन्तर्गत विशेष व्याख्यान

विशेषव्याख्यान – डॉ. लीना रस्तोगी दिनांक 12 डिसेंबर 2017

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे विविध विषयांवर "शास्त्रभारती' या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. या व्याख्यानमाले अन्तर्गत दिनांक 12 डिसेंबर 2017 रोजी मा. डॉ. लीना रस्तोगी यांचे "भारतीय दर्शनाची प्रासंगिकता" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचा आरंभ दीपप्रज्वलाने व सरस्वती स्तवनाने करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले. त्यानंतर मुख्य वक्त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

भारतीय दर्शनांची प्रासंगिकता अत्यंत शास्त्रशुद्धपद्धतीने विविध दृष्टान्ताद्वारे डॉ. लीना रस्तोगी यांनी प्रतिपादीत केली व दार्शनिक औचित्य स्पष्ट केले. हेच सूत्र समोर नेत विभागप्रमुख व अधिष्ठाता मा. डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी दर्शनांची ज्ञानमीमांसा तर्काच्या आधारे स्पष्ट केला व त्याची आधुनिक काळातील आवश्यकतेवर आपले विचार प्रतिपादित केले.

कार्यक्रमाचे संचालन व ऋणनिर्देश डॉ. रेणुका करंदीकर यांनी केले. एकतामंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

4. आचार्य भारती –आद्यशंकराचार्य आणि भगवद्रामानुजाचार्य यांची जयंती

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे दिनांक 20.04.2018 रोजी आचार्य श्रीशंकराचार्य आणि आचार्य रामानुजाचार्य यांच्या जयंतीनिमित्य' आचार्यभारती'कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन गुरुकुलम् सभागृह, रामटेक येथे दु. 11 ते 03 या वेळेत करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी मा. स्वामी अभिषेक ब्रह्मचारी, वाराणसी आणि मा.रोहित कुमार सिंह, पटना हे मुख्यातिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी व विशेष वक्ता म्हणून भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता मा. डॉ. मधुसूदन पेन्ना उपस्थित होते. व्यासपीठावर मा. कुलसचिव व भारतीय दर्शन विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली यावेळी विश्वविद्यालयाचे विद्यार्थी श्री.देवेश्वर आर्वीकर याने वेदमंत्र सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय दर्शन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले.

त्यानंतर सर्व मान्यवरांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर मा.श्री. रोहितकुमार सिंह यांनी उपस्थितांना उद्‌बोधित केले. मा. डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी 'श्रीरामानुजाचार्यांचे वेदान्ततत्त्वज्ञान' या विषयावर मार्गदर्शन केले. मा.कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी यांनी "श्रीशंकराचार्य आणि श्रीरामानुजाचार्यांचे वेदान्त तत्त्वज्ञान" या विषयावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. करपात्री धाम येथील स्वामी अभिषेक ब्रह्मचारी यांनी सभेला मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी वर्ग व शास्त्रजिज्ञासू मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन डॉ. रेणुका करंदीकर यांनी केले.

5. विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमात सहभाग

1. एम. योगशास्त्र प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु. धनश्री लेकुरवाळे हिने आंतरराष्ट्रीय योगा स्पोर्ट फेडरेशन, Buenos, Aires, अर्जेंटिना येथे दिनांक 06 मे 2018 रोजी संपन्न झालेल्या योग स्पर्धेत कांस्य पदक पटकाविले.
2. एम.ए. योगशास्त्र प्रथम वर्षाची विद्यार्थीनी कु. वर्षा मासुरकर हिने दिनांक 17 ते 19 फेब्रुवारी 2018 या कालावधीत गायकवाड – पाटील इंटरनॅशनल स्कूल, नागपूर येथे संपन्न झालेल्या 36 व्या राज्यस्तरीय योग चॅम्पीयनशिप स्पर्धेत आणि महर्षि पतंजलि राज्यस्तरीय योग पुरस्कार नागपूर येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय योग चॅम्पीयनशिप स्पर्धेत सहभाग नोंदविला.
3. एम.ए. योगशास्त्र द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. माधुरी वानकर हिने राजे छत्रपति प्रतिष्ठान गोविंदपूर, सिव्हील लाइन्स, गोंदिया तर्फे छत्रपती चौक, जनता कॉलोनी द्वारे आयोजित जिल्हा युवा उत्कृष्ट राजे छत्रपति प्रतिष्ठान पुरस्कार स्पर्धेत जिल्हा युवा उत्कृष्ट पुरस्कार प्राप्त केला.
4. एम.ए. योगशास्त्र द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी सौ. शुभांगी नायब हिने इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय द्वारा दिनांक 23 ते 25 फेब्रुवारी 2017 या कालावधीत आयोजित भारत बोध अंतराष्ट्रिय संगोष्ठी (International Conference) आणि विश्वेश्वरैया नॅशनल इस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर येथे दिनांक 04 ते 10 जुन 2018 या कालावधीत Research Methodology and Innovations या सात दिवसीय कार्यशाळेत सहभाग नोंदविला.
5. एम.ए. दर्शन द्वितीय वर्षाचा विद्यार्थी चि. परीक्षित झोडेकर याने दिनांक 31.01.2018 ते 03.02.2018 या कालावधीत राष्ट्रियसंस्कृत विद्यापीठ, तिरूपती, आं.प्र. द्वारा आयोजित 12 वा ऑल इंडिया संस्कृत स्टुडन्ट टॅलेन्ट समारोह स्पर्धेत **द्वितीय पुरस्कार (रजत पदक)** प्राप्त केले. त्याने के.जे. सोमय्या, मुंबई द्वारा आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय शास्त्रीयप्रतिस्पर्धेत **प्रथम पुरस्कार** प्राप्त केला. तसेच त्याने राष्ट्रियसंस्कृतसंस्थान दिल्ली द्वारा आयोजित 56 वी अखिल भारतीय शास्त्रीय स्पर्धा, अगरताळा आणि श्रीसोमनाथसंस्कृत विश्वविद्यालय, वेरावलम् द्वारा B.A.P.S. स्वामीशोधनारायण संस्था, अक्षरधाम नवदेहली येथे आयोजित राष्ट्रियशलाकास्पर्धा, दिल्ली येथे सहभाग नोंदविला.

वेदांग ज्योतिष विभाग

स्थापना – **वर्ष 2009**

संकाय – **प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानव्यशास्त्रे संकाय**

अभ्यासक्रम – एम्. ए., एम्. फिल्., पीएच्.डी. वेदांग ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय

विभाग प्रमुख – डॉ. दिनकर मराठे, सहायक प्राध्यापक

सहायक प्राध्यापक – डॉ. प्रसाद गोखले

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 14

उद्दिष्टे –

- प्राचीन भारतीय विज्ञान आणि आधुनिक विज्ञानाचे तौलनिक अध्ययन करणे
- वेदांग ज्योतिष हे प्राचीन भारतीय शास्त्र म्हणून समाजात प्रस्थापित करणे.
- वेदांग ज्योतिष आणि वास्तुशास्त्राबद्दलचे गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे.
- वैदिक साहित्यात दिसून येणा–या प्राचीन भारतीय विज्ञानाच्या बीजांचे सखोल संशोधन करणे
- संस्कृत साहित्याचे मानव्यशास्त्रासाठी असलेले योगदान विविध परिषदा, अध्ययन, सेमिनार या माध्यमातून प्रभावीपणे अधोरेखित करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

1 **आंतरविभागीय संशोधन**

वास्तु व आधुनिक स्थापत्यशास्त्र, सिद्धान्त ज्योतिष व आधुनिक खगोलविज्ञान, मेघ गर्भ लक्षण आणि आधुनिक पर्जन्य अंदाज, आधुनिक ज्योतिषशास्त्र व आयुर्वेद यांमधील आंतविभागीय संशोधनास चालना देणे.

2 **हस्तलिखितांचे संपादन**

- विभागाद्वारे प्राचीन हस्तलिखितांचा अभ्यास, संशोधन व संपादन करण्यास एम्. फिल्. व पीएच्.डी. च्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
- 'जैमिनी सूत्रावरील हस्तलिखिताचे त्याच्या सर्व टीकांसहित पाठचिकित्सा व संपादन' या प्रकल्पाचे कार्य सुरू आहे.

वेदांग ज्योतिष विभाग

सप्त दिवसीय ग्रंथपारायण वर्ग दि. 6.7.2017 ते 13.07.2017 :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागान्तर्गत **"सप्त दिवसीय ग्रंथपारायण"** कार्यक्रम **दि. 11.08.2017 ते 21.08.2017** या कालावधीत करण्यात आला. ग्रंथपारायणचा उद्देश ज्योतिष व वास्तु प्रशिक्षण वर्ग पूर्व प्राथमिक ज्योतिष तथ्यांचा श्रवणाभ्यास करणे हा होता.

1) अवकहड़ा चक्र पठण

2) शुभाशुभ मुहूर्त पठण

3) पंचांग पठण

4) पाराशरी ग्रंथाचे पारायण

उपरोक्त नमूद उद्देशांना अनुसरून पाठयसामग्रीचे संकलन करून विद्यार्थ्यांद्वारा प्रतिदिन दि. 6.07.2017 ते 13.07.2017 पर्यन्त पारायण करण्यात आले. या कार्यशाळेत एकूण 30 विद्यार्थ्यांनी व सर्व विभागातील प्राध्यापकांनी भाग घेतला. ग्रंथपारायण सप्ताहाचे समापन दि. 13.07.2017 रोजी डॉ. हरेकृष्ण अगस्ती, प्राध्यापक, व्याकरण विभाग, यांच्या विशेष उद्‌बोधनाने झाले.

ज्योतिष व वास्तु प्रशिक्षण वर्ग दि. 11.8.2017 ते 21.08.2017 :

दहादिवसीय ज्योतिष व वास्तु प्रशिक्षण वर्गाचे आयोजन **दि. 11.08.2017 ते 21.08.2017** या कालावधीत पदव्युत्तर वेदांग ज्योतिष विभागात करण्यात आले. या प्रशिक्षण वर्गापूर्वी विद्यार्थ्यांनी ग्रंथ पारायण सप्ताहामध्ये भाग घेतला. या प्रशिक्षणाचा उद्देश्य खालील प्रमाणे होता.

1) समाजामध्ये ज्योतिष व वास्तु विषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी असे उपक्रम अत्यन्त उपयोगी ठरतात.

2) शास्त्राचा प्रचार व प्रसार करणे.

3) विश्वविद्यालयीन व विभागीय अभ्यासक्रमांची माहिती लोकांपर्यन्त पोहचविणे.

4) दैनिक जीवनात ज्योतिष व वास्तुशास्त्राचे उपयोग करुन घेण्याकरिता प्रशिक्षणाचा उपयोग होतो.

उपरोक्त उद्देश्यासाठी दि. 11.08.2017 ते दि. 21.08.2017 या कालावधीत रोज दोन तास दुपारी 2:30 ते 4:30 पर्यन्त प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. या प्रशिक्षण वर्गामध्ये **डॉ. ज्ञानेश्वर कुळकर्णी, डॉ. दीपक देशपांडे, डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, डॉ. दिनकर मराठे व डॉ. प्रसाद गोखले** यांनी प्रतिदिवस वेगवेगळे ज्योतिष व वास्तु विषयावर व्याख्यान दिले. रोज व्याख्यानानंतर **प्रश्नोत्तर सत्राचे** आयोजन डॉ. दिनकर मराठे, सहायक प्राध्यापक यांनी केले.

चंद्रग्रहणावर विशेष व्याख्यान व प्रात्यक्षिक :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागान्तर्गत दि. 31.01.2018 रोजी एन.आय.टी संकुल येथे सायं. 04.30 खग्रास चन्द्रग्रहणावर विशेष व्याख्यान व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता प्रमुखातिथी म्हणून भोपाल येथून ज्योतिष विभागाचे प्रमुख डॉ. हंसधर झा उपस्थित होते. तसेच मा. कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. मंचावर वेदांग ज्योतिष विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय होते. डॉ. हंसधन झा यांनी चंद्रग्रहणावर सखोल माहिती दिली. त्यानंतर ग्रहणाचे प्रात्यक्षिक नागपूर परिसरात आयोजित करण्यात आले. खग्रास चंद्रग्रहणाची प्रत्यक्ष माहिती सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांना डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी दिली.

लक्ष्मी नगर, नागपूर येथील निर्माणाधीन प्रकल्पाचे वास्तुशास्त्रदृष्टया परिशीलन :

वेदांग ज्योतिष विभागान्तर्गत वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रम एक वर्षीय चालविला जातो. प्राचीन भारतीय वास्तुशास्त्राच्या परंपरा, शास्त्रीय सिद्धान्त आणि आधुनिक परिवेशामध्ये त्याच्या उपयोगासाठी हा अभ्यासक्रम अत्यन्त महत्वाचा आहे. दरवर्षी सदर अभ्यासक्रमामध्ये छात्र प्रतिसाद उत्तम प्राप्त होतो.

अभ्यासक्रमाचे 80 – 20 पॅटर्न मध्ये आन्तरिक मूल्यांकन पण केले जाते. वास्तुशास्त्राचे दैनिक जीवनात महत्त्वाचे योगदान असल्यामुळे दरवर्षी प्रायोगिक कार्यशाळा आयोजित केली जाते. त्याप्रमाणे वर्ष 2017–18 सत्रासाठी दि. 24.03.2018 रोजी कार्यशाळा सम्पन्न झाली.

कार्यशाळा मध्ये काही विशेष बाब उल्लेखनीय आहेत.

1) वास्तुसाठी भूचयन प्रश्नाचे प्रायोगिक प्रदर्शन

2) चयनित स्थळाचे दिक् साधन शंकूद्वारे

3) पिण्ड निर्माण चे नियम व त्याचे प्रयोग

4) परीक्षण खात विधी द्वारे

5) मातीचे रूप, रस, गंध द्वारे परीक्षण

6) शल्य निरीक्षण वर्तमान संदर्भात कसे करावे

7) शिलान्यास विधिप्रदर्शन

8) जलज्ञान चे स्थान निर्धारणसह प्रयोग

9) स्तम्भ स्थापन प्रकृया

10) सुख– समृद्धी आणि शांती प्राप्त करण्यासाठी उपयोगी चर्चा

उपरोक्त सर्व मुद्यांवर विस्तारपूर्वक प्रयोग करून दर्शविले गेले. याचे आयोजन लक्ष्मी नगर, पाण्याच्या टाकीजवळ, नागपूर येथे निर्माणाधीन भूस्थानावर संपन्न झाले. प्रयोगासाठी जागा उपलब्ध करून श्री. दिनेश पाठक (छात्र ज्योतिष) यांनी सहकार्य केले. यामध्ये वास्तु पदविका अभ्यासक्रमांतर्गत 23 विद्यार्थी व वेदांग ज्योतिष विभागाचे सर्व प्राध्यापक यांचा समावेश होता. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांच्या मार्गदर्शनात भूमिपरीक्षण,

दिक्निर्णय मातीचे परीक्षण, भूगर्भजलज्ञान परीक्षणाचे प्रात्यक्षिक करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी संपूर्ण प्रकल्पाचे वास्तुशास्त्रीय दृष्टिकोणातून परिशीलन केले व सर्व विद्यार्थ्यांनी भेटीचा अहवाल सादर केला. प्रात्यक्षिक व प्रायोगिक पध्दतीने सर्व आवश्यक विषयांचे प्रस्तुतीकरण झाल्यामुळे हा उपक्रम सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी उपयोगी सिध्द झाला. डॉ. प्रसाद गोखले यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. डॉ. दिनकर मराठे यांनी प्रश्नोत्तर भागात पूर्ण सहकार्य केले. सर्वांना अल्पाहार व धन्यवाद देऊन कार्यशाळा सम्पन्न झाली.

भास्कराचार्य व्याख्यानमाला :

क.का. संस्कृत विश्वविद्यालयातील, प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायान्तर्गत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे भास्कराचार्य यांच्या 900 व्या जन्मशताब्दी वर्षाच्या अनुषंगाने वर्ष 2014–15 पासून भास्कराचार्य व्याख्यानमाला प्रारंभ करण्यात आली होती. ज्योतिष विभागातर्फे भास्कराचार्य व्याख्यानमालेअंतर्गत वर्ष 2017–18 मध्ये एकूण 05 व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. त्याचे विवरण पुढील प्रमाणे आहे.

व्याख्यान माले अन्तर्गत व्याख्यान सूची –

1) डॉ. विनोदकुमार शर्मा , जयपूर – ज्योतिष एवं आध्यात्म दि. 26.02.2018

2) डॉ. श्यामदेव मिश्र, भोपाल – "ज्योतिषशास्त्र में राधातत्त्व" दि. 16.02.2018

3) डॉ. भारतभूषण मिश्र, मुंबई – "राष्ट्र निर्माण में ज्योतिष का योगदान" दि. 24.01.2018

4) डॉ. अमितकुमार शुक्ल, भोपाल – "ज्योतिष एवं वास्तुशास्त्र की प्रासंगिकता" दि. 20.01.2018

5) डॉ. उपेंद्र भार्गव, उज्जैन – दैनिकीवन में ज्योतिष दि. 01.05.2018

शिक्षणशास्त्र विभाग

स्थापना – वर्ष 2008

संकाय – शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय

अभ्यासक्रम – एम्. एड्., एम्. फिल्., पीएच्.डी. शिक्षणशास्त्र

अधिष्ठाता – प्रो. ललिता चंद्रात्रे

विभाग प्रमुख – डॉ. कीर्ती सदार, सहयोगी प्राध्यापिका

सहायक प्राध्यापक – डॉ. हृषिकेश दलाई, डॉ. अमोल मांडेकर, डॉ. राजश्री मेश्राम, प्रा. अनघा आंबेकर

पीएच्.डी कार्यरत विद्यार्थी संख्या – 18

उद्दिष्टे –

- संस्कृत शिक्षकांची तथा इतर शिक्षकांची निर्मिती करणे
- प्राचीन भारतीय शिक्षण संकल्पना आणि आधुनिक शिक्षण पद्धती आणि विचारांचे अध्ययन–अध्यापन आणि संशोधन करणे.
- संस्कृत शिक्षण पद्धती आधुनिक काळाशी सुसंगतरित्या विकसित करणे.
- जागतिक स्तरावरील शिक्षण विचारांचा आणि सिद्धांताचा अद्ययावत अभ्यास करून अभ्यासक्रमाची रचना करणे.

संशोधन कार्यविषयक ध्येये –

- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत संशोधकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे
- मार्गदर्शकांचे संशोधन लेख प्रकाशित करणे.
- विविध परिषदा, सेमिनार, कार्यशाळा यामध्ये विद्यार्थी, संशोधक छात्र आणि प्राध्यापकांचा सहभाग

शिक्षणशास्त्र विभाग

पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभागात शैक्षणिक सत्र 2017–18 मध्ये खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

1) एम्.एड्. आंतरवासिता उद्बोधन –

आंतरवासिता कार्यक्रमात एम.एड.च्या विद्यार्थी शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या कृतीविषयी त्यांना आकलन व्हावे या उद्देशाने एम.एड. आंतरवासिता कार्यक्रम उद्बोधन वर्गाचे दि. 28/08/2017 रोजी आयोजन करण्यात आले होते. या उद्बोधन वर्गात पुढील घटकांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.

1) पाठ नियोजन	–	प्रा. अनघा आंबेकर
2) व्यष्टी अभ्यास	–	डॉ. इंदूमती भारंबे
3) पाठ निरीक्षण	–	डॉ. ललिता चंद्रात्रे
4) वर्ग कसोटीचे नियोजन व प्रशासन	–	डॉ. कीर्ती सदार
5) प्रार्थना, परिपाठ व उपस्थिती	–	डॉ. अमोल मांडेकर
6) सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन	–	डॉ. राजश्री मेश्राम
7) शालेय नोंदी	–	डॉ. ऋषिकेश दलाई

2) शैक्षणिक संशोधन पध्दती कार्यशाळा –

एम.एड्. व पीएच.डी. कोर्स वर्कच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय शैक्षणिक संशोधन पध्दती कार्यशाळा 9 सप्टेंबर 2017 रोजी आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत कार्यशाळेत संशोधन उपागम, संशोधन पध्दती व संकलित माहितीचे विश्लेषण या घटकांवर चर्चा करण्यात आली. डॉ इंदुमती भारंबे, डॉ. ललिता चंद्रात्रे, डॉ. कीर्ती सदार व डॉ. राजश्री मेश्राम यांनी या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

3) संशोधन अहवाल लेखन कार्यशाळा –

एम.एड. व पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसाठी 12 फेब्रु. 2018 रोजी संशोधन अहवाल लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत संशोधन अहवाल लेखनाची आवश्यकता, संशोधन अहवालाचे सर्वसामान्य प्रारूप, अहवालातील प्रारंभिक विभाग, प्रमुख विभाग आणि संदर्भ विभाग याविषयी विभागातील सर्व प्राध्यापकांनी सविस्तर मार्गदर्शन केले, त्यानंतर चर्चा करण्यात आली.

वार्षिक अहवाल

मराठी

प्रकरण दुसरे
विस्तार सेवा अहवाल

विस्तार सेवा अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना

पदव्युत्तर शैक्षणिक विभाग पथक अहवाल

आंतरराष्ट्रीय योग दिवस 21.06.2017 :

शासनाच्या निर्देशानुसार दिनांक 21 जुन 2017 रोजी सकाळी 07.00 वा पदव्युत्तर शैक्षणिक विभागात क.का. संस्कृत विश्वविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरीता योगाभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, भारतीय धर्म तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना, मा.वित्त व लेखाधिकारी डॉ. रामचंद्र जोशी, मा. परिक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, मा. संचालक वि.नि.मं. डॉ. विजयकुमार सी.जी.यांच्यासह प्राध्यापकवर्ग अधिकारीवर्ग, व शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. योगशास्त्र विभागातील कु. सुजाता द्रव्यकार यांनी विविध योगासनांची प्रात्याक्षिकांसह माहिती दिली. व उपस्थितांकडून योगाभ्यास करून घेतला.

वृक्षारोपण अभियान : 06.07.2017

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रामटेक येथील मुख्यालयात आज गुरुवार, दि. 6 जुलै 2017 रोजी वृक्षारोपण अभियान संपन्न झाले. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार दि. 1 जुलै ते 7 जुलै ''वृक्ष लावा, वृक्ष जगवा'' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत विश्वविद्यालयाचा एकूण 500 झाडे लावण्याचा संकल्प आहे. त्यापैकी 50 झाडे आज विश्वविद्यालयाच्या मुख्यालयात लावण्यात आली.

विश्वविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रासेयो समन्वयक डॉ. दिनकर मराठे यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी 'वृक्षो रक्षति रक्षितः' या उद्घोषणेच्या गजरात मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या शुभहस्ते गुलमोहराचे झाड लावून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. आपण लावलेले झाड आपण दत्तक घ्यावे आणि त्याची निगा राखावी असा मनोदय कुलगुरूंनी प्रकट केला.

कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, विद्यापीठ नियोजन मंडळाचे संचालक डॉ. सी. जी. विजयकुमार, वित्त व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी, परीक्षानियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, डॉ. चंद्रशेखर वैद्य, रासेयो समन्वयक डॉ. दिनकर मराठे उपकुलसचिव श्री. प्रकाश जयस्वाल, सहायक कुलसचिव श्री. कैलाश मून, श्री. नरेंद्र रहाटे आणि अन्य सहका–यांच्या आणि हस्ते गुलमोहर, सप्तपर्णी, कडुनिंब इ. झाडे लावण्यात आली. या मोहिमेत विश्वविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रेणुका बोकारे, उपअभियंता श्री. संतोष वाडीकर आणि सुरक्षा अधिकारी श्री. प्रवीण कळंबे यांचे सहकार्य कार्यक्रमाला लाभले.

स्वच्छ भारत अभियान पंधरवडा दि. 5.08.2017 :

केंद्रसरकारतर्फे दरवर्षी 1 ते 15 ऑगस्ट हा पंधरवडा स्वच्छता पंधरवडा म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे रामटेक गडमंदिर आणि कालिदास स्मारक येथे शनिवार, दि. 5 ऑगस्ट 2017 रोजी स्वच्छ भारत अभियान आयोजित करण्यात आले होते. रामटेकमधील गडमंदिर हे अतिशय महत्त्वाचे धार्मिक व पर्यटन स्थळ आहे. याशिवाय महाकवी कालिदासाच्या वास्तव्याने या रामगिरीला ऐतिहासिक व वाड्मयीन महत्त्व प्राप्त झाले आहे. या रामगिरीवर कविकुलगुरू कालिदासाने मेघदूतम् या विरहकाव्याची रचना केली. महाकवी कालिदासाच्या चिरस्मरणार्थ शासनाने कालिदास स्मारक उभारले आहे. त्यामुळे रामगिरीच्या पायथ्याशी असणा–या संस्कृत विद्यापीठासाठी गडमंदिर व कालिदासस्मारक हया परिसराची स्वच्छता करणे हे परमकर्तव्यच ठरते. तसेच रामटेक येथील विश्वविद्यालयाच्या मुख्यालयातही सर्व अधिकारी व कर्मचा–यांनी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. दिनकर मराठे यांनी सर्वांकडून मा. पंतप्रधानांनी दिलेल्या स्वच्छता प्रतिज्ञेचे अनुवाचन करविले.

या अभियानात रासेयो पथकाचे 30 स्वयंसेवक सहभागी झाले होते. त्यांनी रामटेक गडमंदिरावरील परिसर तसेच कालिदास स्मारकाचा अंतर्बाहय परिसर स्वच्छ केला. रासेयो अधिकारी डॉ. दिनकर मराठे यांच्या नेतृत्वाखाली, डॉ. जयवंत चौधरी, डॉ. पराग जोशी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रेणुका बोकारे, श्री. प्रवीण कळंबे इ. सहकारी सहभागी झाले होते.

प्रस्तुत अभियान कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. उमा वैद्य म्हणाल्या,'' शरीराची स्वच्छता आपसूकच सवयीने केली जाते. घरासह परिसराची, कार्यालयाची स्वच्छता केवळ अभियान या अर्थाने मर्यादित राहू नये तर त्यामध्ये सातत्यही राखले जावे. ही स्वच्छता बाहय अत एव दृश्य आहे; परंतु बाहय स्वच्छतेसह प्रत्येकाने आपल्या मनाचीही स्वच्छता राखली पाहिजे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंची मनावर साठलेली जळमटे दूर झाली की बाहय स्वच्छतेसह अंतरंगाची देखील स्वच्छता राखली जाईल. यासाठी प्रत्येकाने स्वतःचे आत्मपरीक्षण करावयास हवे. मन अर्थात् अंतरंग निर्मल झाले की त्याचा परिणाम बाहय स्वच्छतेवर आपोआपच होईल. त्यामुळे स्वच्छ भारत अभियान हे केवळ बाहय स्वच्छतेपुरतेच मर्यादित न राहता प्रत्येकाच्या अंतरंगाचाच भाग होईल.''

नवग्रहवाटिकेचे उद्घाटन 07.09.2017 :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा पदव्युत्तर ज्योतिष विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना पथक यांच्या संयुक्त विद्यमाने रामटेक येथील प्रशासकीय मुख्यालयाच्या परिसरात नवग्रहवाटिकेचे उद्घाटन करण्यात आले. सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, केतु, राहू या नवग्रहांचे अनुक्रमे अर्क, पळस, खदिर, अपामार्ग, अश्वत्थ, औदुंबर, शमी, कुश, दुर्वा या वृक्षवनस्पतींचे रोपण हेमलंबी संवत्सरात भाद्रपद कृष्ण प्रतिपदा अर्थात् गुरुवार, दि. 7 सप्टेंबर 2017 रोजी करण्यात आले.

ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक ग्रहाचा एक विशिष्ट असा वृक्ष असतो. मानवाला पीडा देणा–या विविध रोगांचे निराकरण या वृक्षांच्या रोपणाने आणि त्यांच्या औषधी गुणधर्माने होत असते. ज्योतिष शास्त्र आणि आयुर्वेद यांचा संबंध आधुनिक युगात सिद्ध झाला असून अशा वनौषधी गुण असणा–या वृक्षांची जोपासना, संवर्धन, संरक्षण आणि विद्यार्थ्यांना त्याची प्रत्यक्ष ओळख व त्यावरील संशोधन करण्याच्या हेतूने विद्यापीठाच्या ज्योतिष विभागाने नवग्रहवाटिका तयार करण्याचा निश्चय केला. आज या वाटिकेचे सूर्य या ग्रहाचा अर्क वृक्ष लावून उद्घाटन कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

नवग्रहवाटिकेची मूळ संकल्पना डॉ. उमा वैद्य यांची होती, तिचे साफल्य आज विविध वृक्षांच्या रोपणाने झाले. अर्क या रोपासह पळस, खदिर, अपामार्ग, अश्वत्थ, औदुंबर, शमी, कुश, दुर्वा या रोपांचे रोपण डॉ. चंद्रशेखर वैद्य, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, वित्त व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी, ग्रंथपाल दीपक कापडे, रासेयो समन्वयक डॉ. दिनकर मराठे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. जयवंत चौधरी, डॉ. पराग जोशी, श्री. राजीवरंजन मिश्रा, श्री. प्रवीण कळंबे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

विश्वविद्यालय संचालित कालिदास अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शिबिर सध्या सुरू आहे. त्यानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. बी. एड्. च्या विद्यार्थ्यांनी मुख्यालयाला भेट दिली. याप्रसंगी परिसरात डाळिंब, पेरू आणि आंब्याच्या रोपांचे रोपणही मा. कुलगुरू, कुलसचिव , मा. प्राचार्य डॉ. हृषिकेश दलई आणि विद्यार्थ्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात नवग्रहवाटिकेबद्दल ज्योतिष विभाग प्रमुख डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी माहिती दिली तर प्रशिक्षण शिबीराविषयी प्राचार्य डॉ. दलई यांनी माहिती दिली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. उमा वैद्य, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांची विशेष उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात बोलताना कुलगुरू डॉ. वैद्य म्हणाल्या, विश्वविद्यालयात नवग्रहवाटिका असावी, एवढेच नव्हे तर यासंदर्भात विद्यार्थ्यांना आणि अभ्यागत तसेच संस्कृतानुरागींना अधिक माहिती मिळावी यासाठी लघुचित्रपटाची निर्मिती ज्योतिष विभागाने करावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. वृक्षारोपणाद्वारे आपण पर्यावरणाबद्दलची आस्था जोपासत असतो. ती केवळ वृक्ष लावल्याने संपत नाही तर लावलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संवर्धन व रक्षणाची जवाबदारीही उचलावी लागते. आज लावलेल्या रोपांची जवाबदारीही विद्यापीठातील सदस्यांनी उचलावी असे आवाहन त्यांनी केले. नवग्रहवाटिकेसह वनौषधीवाटिका आणि नक्षत्रवाटिका तयार करण्याची जवाबदारी ज्योतिष विभागाने पूर्ण करावी असे सांगून प्राचीन शास्त्रांचा आधुनिक ज्ञान–विज्ञानाशी मेळ घालण्याचे महत्त्वाचे कार्य हे विद्यापीठाने केले असल्याचे डॉ. वैद्य यांनी साभिमान नमूद केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. आशा नासरे यांनी तर आभार डॉ. जयवंत चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर सहकारी, विद्यार्थी उपस्थित होते. अभियांत्रिकी विभागातील उपअभियंता श्री. संतोष वाडीकर, श्री. प्रवीण कळंबे तसेच अन्य सहका–यांचे विशेष सहकार्य लाभले.

अवयवदान पंधरवडा 09.09.2018 :

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रा.से.यो पथकाद्वारे "सक्षम नागपूर" या सामाजिक संस्थेच्या सहभागाने अवयव दान पंधरवडा अंतर्गत दि. 09.09.2017 रोजी अभिनय, गीत व नृत्य या माध्यमातून अवयव दानाविषयी कार्यक्रम प्रस्तुत करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये "सक्षम नागपूर" उसंस्थेचे समन्वयक व त्यांची पूर्ण चमूतील 10 कलाकार उपस्थित होते. विद्यापीठातर्फे सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक, रा.से.यो. स्वयंसेवक असे एकूणप 60 जण उपस्थित होते. "सक्षम नागपूर" संस्थेच्या कलाकारांनी अवयव दान महत्त्वाविषयी नाटक प्रस्तुत केले. त्यानंतर रक्तदान, नेत्रदान, शरीरदानासंबंधी माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे उत्तर दिले व सर्वांना अवयव दान करण्यासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमानंतर सर्वांनी अवयव दान करण्याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले.

स्वच्छता ही सेवा या अभियानांतर्गत मोरभवन बसस्थानकात स्वच्छता अभियान 02.10.2017 :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि क.का.सं.वि. संलग्नित महाविद्यालयांच्या रासेयो पथक यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त दि. 2 ऑक्टोबर 2017 रोजी सकाळी ठीक 8.30 वाजता स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या स्वच्छता ही सेवा या संदेशाला अनुलक्षून संस्कृत विद्यापीठाद्वारे अत्यंत वर्दळीचा परिसर असणा–या मोरभवन बसस्थानकाची स्वच्छता करण्याचा संकल्प करण्यात आला. मोरभवन स्थानकाची स्वच्छता रासेयो स्वयंसेवकांच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि उत्साहाने संपन्न झाली. रासेयो स्वयंसेवकांनी केलेल्या श्रमदानामुळे महात्मा गांधींजींच्या स्वप्नातील स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करण्यास विद्यापीठाच्या रासेयो पथकाने स्वतःच्या शैक्षणिक परिसरापासूनच सुरुवात केली. नासुप्र संकुलाचा परिसर तसेच मोरभवन बसस्थानकाचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

विश्वविद्यालयाच्या नागपूर येथील शैक्षणिक परिसराच्या प्रांगणात सर्वांनी राष्ट्रगीत म्हटले तसेच अहिंसा आणि स्वच्छ भारताची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन रासेयो समन्वयक डॉ. दिनकर मराठे यांनी केले. स्वच्छता अभियानासाठी विद्यापीठाचे रासेयो समन्वयक डॉ. दिनकर मराठे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, डॉ. हरेकृष्ण अगस्ती, डॉ. शिवराम भट, डॉ. हृषिकेश दलई, डॉ. पराग जोशी, प्रा. पंकज दवंडे, श्री. सुमीत कठाळे आणि संलग्नित महाविद्यालयांचे रासेयो अधिकारी तसेच रासेयो स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तुत कार्यक्रम राबविण्यात आला.

युवा दिवस 12.01.2018 :

सुदृढ भारताच्या निर्माणाकरिता आज देशाला युवकांपेक्षा सुसंस्कृत युवकांची नितान्त आवश्यकता आहे व या मध्ये संस्कृतभाषेचे अध्ययन करणा–या संस्कृत युवकांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे वक्तव्य क.का.सं.वि. चे कुलगुरू आचार्य श्रीनिवास वरखेडी यांनी विवेकानंद जयन्ती निमित्त आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या "युवा दिवस" कार्यक्रमात

केले. क.का.सं.वि. च्या रा.से.यो. पथकाद्वारे आज विवेकानंद जयंती निमित्ताने युवा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संस्कृत विभागातील डॉ. दिनेश रसाळ उपस्थित होते. स्वामी विवेकानंदांच्या जीवनचरित्रावर सुंदर प्रकाश टाकत त्यांनी सुसंस्कारित युवकांच्या निर्मितिकरिता विवेकानंद–दर्शन कसे आवश्यक आहे हे आपल्या उत्स्फूर्त व रसाळवाणीद्वारे स्पष्ट केले. कार्यक्रमात विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव, डॉ. अरविंद जोशी तसेच रा.से.यो. समन्वयक, डॉ. दिनकर मराठे उपस्थित होते. श्री. भा. वर्णेकरांच्या विवेकानन्दगीताद्वारे कार्यक्रमाची सुरुवात झाली व यानंतर रा.से.यो. स्वयंसेवकाद्वारे विवेकानंद साहित्यावर प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्वामी विवेकानंदांच्या स्मृती निमित्त उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदांची पुस्तके, स्मरणिका इ, भेट रूपाने देण्यात आल्या. कार्यक्रमाकरिता विश्वविद्यालयाचे सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. जयवंत चौधरी व प्रश्नमंजूषा इ. स्पर्धांचे संचालन श्रीवरदा माळगे, रूपेश रुद्रकार इत्यादिंनी केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ग्रंथदिंडी 21.02.2018 :

कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दि. 21.02.2018 रोजी मराठी भाषा व मराठी ग्रन्थांचे महत्त्व समाजापुढे आणण्याकरिता नागपूरच्या सीताबर्डी परिसरात ग्रथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन मा. कुलगुरु, प्रा. श्रीनिवास वरखेडी, संचालक, नियोजन विकास मंडळ, डॉ. विजयकुमार व वित्त व लेखाधिकारी डॉ. रामचंद्र जोशी यांच्या उपस्थितीत झाले. पालखीमध्ये संत ज्ञानेश्वर रचित ज्ञानेश्वरी व इतर अभिजात मराठी ग्रन्थ देवून सम्पूर्ण पालखी विविध फूलांनी सजवून ही मराठी ग्रन्थ दिंडी काढण्यात आली. रा.से.यो पथकातील सर्व स्वयंसेवक तसेच विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग असे मिळून जवळपास 75 लोकांनी यात सहभाग घेतला व स्वयं प्रत्यक्ष विश्वविद्यालयाच्या कुलगुरूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसरापासून ही ग्रंथदिंडी सुरु होऊन व्हेरायटी चौकातून फिरून झांशी राणी चौकापर्यन्त नेण्यात आली. तिथून परत शैक्षणिक परिसरात पोहचली. महाराष्ट्रातील थोर संत व त्यांच्या साहित्यातील ओव्या, पद्य, गद्य इत्यादिंचा उच्च जयघोष करत व विद्यार्थ्यांनी कवि विं.दा. करंदीकर, वि.स. खांडेकर, इत्यादिंच्या साहित्याचे समाजाला संदेश देणारे घोषवाक्य व भाषेच्या गौरवाचे फलक प्रदर्शन करुन या ग्रंथदिंडीकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांची जय उद्घोषाद्वारे संपूर्ण वातावरण दुमदुमून गेला होता. या ग्रंथदिंडीचे आयोजन कार्यक्रम अधिकारी, डॉ. जयवंत चौधरी यांनी केले.

हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय ,रामटेक येथे राष्ट्रीय पांडुलिपी मिशन, नवी दिल्ली यांचे मान्यताप्राप्त हस्तलिखित स्त्रोत केंद्र वर्ष 2004 पासून कार्यरत आहे. विदर्भ व मराठवाडा भागातील हस्तलिखितांची माहिती संग्रह करून राष्ट्रीय पांडुलिपी मिशन, नवी दिल्ली यांना पाठवायची जवाबदारी केंद्राची आहे. रामटेक केंद्राने अद्ययावत 16,528 हस्तलिखितांची माहिती संग्रहित केली आहे.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक व राष्ट्रीय पांडुलिपी मिशन नवी दिल्ली यांच्यातील सामंजस्य कराराचे जानेवारी 2018 ते डिसेंबर 2020 पर्यंत नूतनीकरण करण्यात आले.

हस्तलिखितांची माहिती संग्रहित करणे. तसेच हस्तलिखिताबद्दल समाजात जागृती निर्माण करणे ही कार्य हस्तलिखित स्त्रोत केंद्र, रामटेक द्वारे करण्यात येते. या अनुषंगाने वर्ष 2017–18 साली विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

जागृती अभियान

व्याख्यानमाला–

हस्तलिखित स्त्रोत केंद्र, रामटेक द्वारा वर्ष 2017–18 साली व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानमालेत हस्तलिखितांचे महत्त्व, प्राचीन भारतात लेखन सामग्री व लेखन कलेचा इतिहास, हस्तलिखितांचे संपादन, हस्तलिखितांचे संरक्षण व संवर्धन, सचित्र हस्तलिखित इत्यादी विषयांवर व्याख्याने आयोजित केली होती.

कार्यशाळा–

हस्तलिखित स्त्रोत केंद्र, रामटेक द्वारा एका कार्यशाळेचे आयोजन केले. होते या कार्यशाळेत ग्रंथ व मोडी लिपीचा समावेश होता.

हस्तलिखित प्रदर्शिनी–

हस्तलिखित क.का.संस्कृत विद्यापीठाच्या रामटेक व नागपूर परिसरात हस्तलिखितांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

हस्तलिखितशास्त्र पदविका अभ्यासक्रम–

हस्तलिखितांबद्दलचे ज्ञान व संशोधन व्हावे या दृष्टिकोनातून हस्तलिखितशास्त्रात पदविका अभ्यासक्रम वर्ष 2017–2018 साली चालविण्यात आला.

छात्र कल्याण विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा सांस्कृतिक कार्यक्रम–2018 दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. 22,23,24 जानेवारी 2018 रोजी गुरूनानक भवन, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून महापौर, सौ. नंदाताई जिचकार होत्या. तसेच अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू, मा. डॉ. श्रीनिवास वरखेडी, कुलसचिव, मा. डॉ. अरविंद जोशी, डॉ. मधुसूदन पेन्ना, डॉ. नंदा पुरी, डॉ. विजयकुमार, डॉ. ललिता चंद्रात्रे, डॉ. कृष्णकुमार पांण्डेय, डॉ. राजश्री मेश्राम, संचालक छात्रकल्याण तसेच हया कार्यक्रमाच्या समन्वयिका डॉ. राजश्री मेश्राम व सर्व संकायाचे विद्यार्थी प्रतिनिधी मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. नंदा पुरी यांच्या प्रास्तविकाने झाली व विद्यार्थी प्रतिनिधींनी मनोगत प्रस्तुत केले. त्यानंतर कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात पदव्युत्तर, संस्कृत विभाग पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग तसेच कालिदास विद्यापीठाचे अध्यापक महाविद्यालय यांच्या हस्तलिखितांचे अनुक्रमे "**धीषणा, ज्ञानदीप व तेजस्विनावधितमस्तु**" चे प्रकाशन करण्यात आले. तद्नंतर प्रमुख अतिथी मा. महापौर सौ. नंदाताई जिचकार यांनी मार्गदर्शन केले. संक्रमणोत्सवा दरम्यान आयोजित विविध स्पर्धा घेण्यात आले होते व आयोजित स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. त्यानंतर मा. कुलगुरूंचे अध्यक्षीय भाषण झाले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. शिवराम भट्ट यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. राजश्री मेश्राम समन्वयक, संक्रमणोत्सव यांनी केले. समापन समारंभाचा शेवट वंदेमातरम ने झाला.

त्यानंतर योगाचे उत्कृष्ट प्रयोग सादर करण्यात आले व नंतर नृत्य, नाटक, गायन, फॅन्सी ड्रेस तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले.

हया कार्यक्रमात मा. कुलगुरू,कुलसचिव, परिक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, वित व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी, संचालक बी.पी.डी. डॉ. विजयकुमार, सर्व विभागाचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक आणि डॉ. प्रसाद गोखले सहसमन्वयक, विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते अशा प्रकारे सर्वाच्या सहकार्याने संक्रमणोत्सव 2018 यशस्वीरित्या पार पडला.

गुणवत्ताधारक विद्यार्थी पुरस्कार वितरण

विश्वविद्यालयाचा 20 वा वर्धापन दिन 18.09.2017 रोजी मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. सदर कार्यक्रमात विश्वविद्यालयातील प्रत्येक विभागातील सत्र 2016–17 मधील गुणवत्ताधारक 06 विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक तसेच प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सदर रोख पुरस्कार विद्यार्थ्यांच्या खात्यात नेफ्टव्दारे जमा करण्यात आले. गुणवत्ताधारक विद्यार्थी पुरस्कार वितरणाची पूर्ण प्रक्रिया डॉ. राजश्री मेश्राम संचालक, छात्र कल्याण विभागाव्दारे करण्यात आली.

कार्यक्रमात विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य , मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. सिध्दार्थ विनायक काणे, नागपूर विद्यापीठाचे मा. प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, सांची विद्यापीठाच्या पूर्व कुलगुरू प्रो. शशिप्रभा कुमार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पुरस्कार प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

क्रीडा विभाग

क्रीडा महोत्सव 2017

21 वा महाराष्ट्र आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव 2017 डॉ. बाळासाहेब सावंत कोकण विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी येथे दि. 27.11.2017 ते 01.12.2017 या कालावधीत संपन्न झाला यात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या क्रीडा चमूने सहभाग घेतला. या चमूमध्ये 15 पुरूष विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडाप्रकारांमध्ये सहभाग घेतला. या चमूमध्ये डॉ. अमोल मांडेकर, संचालक, शारीरिक शिक्षण व श्री प्रवीण कळंबे सुरक्षा अधिकारी पुरूष संघ व्यवस्थापक तसेच सुनील खरवडे, संघ व्यवस्थापक सहभागी होते. विद्यार्थ्यांनी क्रीडा महोत्सवात क्रीडा कौशल्याचे उत्तम दर्शन घडविले.

सरलमानक संस्कृत कार्यशाला

विस्तार सेवा मंडळ

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय आणि संस्कृत संवर्धन प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 19 मार्च 2018 रोजी "सरलमानकसंस्कृत कार्यशाळा" चे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेसाठी ONGC - CSR - SPF परियोजनेचा सहयोग प्राप्त झाला.

- कार्यशाळा स्थल – पदव्युत्तर संस्कृत विभाग, क.का.सं.वि., नागपूर
- कार्यशाळा अवधि – दि. 19 मार्च 2018 प्रातः 10:00 ते 4:30 पर्यन्त
- कार्यशाळा प्रतिनिधी संख्या – 62

कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. चांदकिरण सलुजा अध्यक्ष, संस्कृत संवर्धन प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांनी केले. अध्यक्षीय भाषण मध्ये प्रो. श्रीनिवास वरखेडी, कुलगुरू, क.का.सं.वि. यांनी संस्कृत कार्यशाळेचे महत्त्व प्रतिपादित केले. प्रथम व द्वितीय सत्रात डॉ. चांदकिरण सलुजा यांनी मार्गदर्शन केले तर डॉ. नन्दा पुरी, अध्यक्षस्थानी होत्या. तृतीय सत्रात डॉ. सी.जी. विजयकुमार, अधिष्ठाता, वेद तथा व्याकरण विभाग यांनी मार्गदर्शन केले. चतुर्थ आणि समापन सत्रामध्ये प्रा. मधुसूदन पेन्ना यांनी अध्यक्षपदावरुन मार्गदर्शन केले. या प्रसंगी विशेष उपस्थिती श्री. शिरीष देवपुजारी यांची होती. सर्व सत्रांचे संचालन डॉ. शिवराम भट्ट यांनी केले. उद्घाटन सत्रामध्ये नवसंवत्सर फळ डॉ. दिनकर मराठे व विभागीय छात्रांनी वेदमंत्र घोष केला. सम्पूर्ण कार्यशाळेचे समन्वयन व प्रस्ताविक प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, निदेशक, विस्तार सेवा मण्डल, क.का.सं.वि. यांनी केले. समापन सत्रात आभार डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी मानले. एकता मंत्राने कार्यशाळेचा समारोप झाला.

विस्तार सेवा मंडळ द्वारा आयोजित सरलमानकसंस्कृत कार्यशाला (20)

संस्कृत संवर्धन प्रतिष्ठान नवी दिल्ली एवं विस्तार सेवा मण्डल, क. का. सं. वि., रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने सम्पूर्ण महाराष्ट्रात विविध ठिकानी जवळपास 20/21 सरलमानकसंस्कृत कार्यशाळा संपन्न झाल्या. यादी व कार्यक्रमाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	दिनांक	स्थान	समन्वयकाचे नाव	प्रशिक्षक	प्रतिभागींची संख्या
1	19.3.18	क.का.सं.वि. नागपूर परिसर	डॉ. कृष्णकुमार पाण्डेय,	डॉ. श्रीनिवास वरखेडी मा. कुलगुरू डॉ. चांदकिरण सलूजा, संस्कृत संवर्धन प्रतिष्ठान,	70
2	07.4.18	लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी	डॉ. स्वानन्द पुण्ड	डॉ. सी.जी. विजयकुमार एवं डॉ. विभा क्षीरसागर	30
3	19.4.18	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	डॉ. अजय निलंगेकर	डॉ. पराग जोशी,	54
4	21.4.18	अहिल्यादेवी कन्या विद्यालय, भुसावळ	आशिष सैतवाल,	डॉ. सी.जी. विजयकुमार एवं श्री. लोकेश मेहता	34
5	22.4.18	एम.जे. महाविद्यालय, जळगाव	डॉ. भाग्यश्री सुधीर भलवतकर,	डॉ. सी.जी. विजयकुमार एवं श्री. लोकेश मेहता	39
6	24.4.18	सी.पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय, नागपूर	डॉ. विभा क्षीरसागर,	डॉ. सी.जी. विजयकुमार एवं डॉ. कृष्णकुमार पाण्डेय	36
7	24.4.18	मराठा महाविद्यालय, गंगापुर रोड, नाशिक	श्री. गजानन अंभोरे,	श्री. सुमित कठाळे	62
8	24.4.18	कांतीलाल पुरुषोत्तमदास शहा प्रशाला विश्रामबाग, सांगली	श्री. तुपेशास्त्री,	डॉ. प्रसाद गोखले	40
9	27.4.18	शंकरलाल खण्डेलवाल कॉलेज, अकोला	जयश्री शकलकले	डॉ. सी. जी. विजयकुमार	55

अ. क्र.	दिनांक	स्थान	समन्वयकाचे नाव	प्रशिक्षक	प्रतिभागींची संख्या
10	29.4.18	लोकमान्य टिळक कन्या विद्यालय, चंद्रपूर	सौ. मुग्धा पाठक,	डॉ. सी.जी. विजयकुमार	15
11	30.4.18	भारत शिक्षण संस्था, वर्धा	श्री. प्रशांत शंकर लिडबे	डॉ. सी.जी. विजयकुमार	45
12	02.5.18	वालचंद आर्टस कॉमर्स महाविद्यालय, सोलापूर (जनपद)	आचार्य महावीरशास्त्री	डॉ. राजेन्द्र जैन,	32
13	02.5.18	वालचंद आर्टस कॉमर्स महाविद्यालय, सोलापूर (ग्रामीण)	आचार्य महावीरशास्त्री	डॉ. राजेन्द्र जैन,	32
14	03.5.18	बाहुबली विद्यापीठ कुंभोज, हातकलंगळे, कोल्हापूर	श्री. नेमिनाथ शास्त्री,	डॉ. राजेन्द्र जैन,	48
15	06.5.18	संस्कृत भारती, अमरावती, (जनपद)	श्री.देवदत्त कुळकर्णी	डॉ. सी.जी. विजयकुमार एवं डॉ. हृषिकेश दलाई	40
16	06.5.18	संस्कृत भारती, अमरावती (ग्रामीण)	श्री.उल्हास बपोरीकर	डॉ. सी.जी. विजयकुमार एवं डॉ. हृषिकेश दलाई	20
17	12.5.18	टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ, डोंबिवली	श्री.नीरज वामन दांडेकर	श्री. सुमित कठाळे एवं श्री.आशिष सैतवाल	28
18	13.5.18	महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड(पश्चिम)	श्री.गुरूप्रसाद कार्लेकर	श्री. सुमित कठाळे एवं श्री.आशिष सैतवाल	35
19	29.5.18	सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे	डॉ.ज्योत्स्ना खरे	डॉ. कल्याणी काळे, नागपूर एवं डॉ. श्रीपाद भट्ट, पुणे	37
20	24.06.18	स्वामी मुक्तानंद विद्यालय, येवले (नाशिक)	डॉ.प्रसादशास्त्री कुळकर्णी	श्री. आशीष सैतवाल	53
				एकूण प्रतिभागी संख्या	805

मराठी भाषा गौरव दिन अहवाल

दि. 27.02.2018

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे रामटेक येथील सिल्व्हर ज्युबिली सभागृह, किटस् कॉलेज, रामटेक येथे मंगळवार, दि. 27 फेब्रुवारी 2018 रोजी ''मराठी भाषा गौरव दिन'' मोठया उत्साहाने संपन्न झाला. या विशेष कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी या नात्याने आमदार श्री. मल्लिकार्जुन रेड्डी, नगराध्यक्ष श्री. दिलीप देशमुख उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून परभणी येथील प्रख्यात लोकसाहित्यिक आणि प्राचार्य साहेबराव खंदारे, आणि विशेष अतिथी या नात्याने रामटेकचे उपविभागीय अधिकारी श्री. राम जोशी, किटस् चे प्राचार्य डॉ. बी. राम रतन लाल, सरपंच योगिता गायकवाड उपस्थित होत्या कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले. डॉ. नंदा पुरी, डॉ. सी. जी. विजयकुमार, डॉ. कविता होले, डॉ. हृषिकेश दलई, श्री. अशोकजी बर्वे, श्री. ईश्वर आष्टनकर, डॉ. रामचंद्र जोशी व्यासपीठावर विशेषत्वाने उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ विद्यार्थिनींनी गायिलेल्या विश्वविद्यालय गीताने आणि मराठी भाषा गौरव गीताने झाला. प्रास्ताविक मराठी साहित्य मंडळाच्या अध्यक्षा तथा अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी यांनी केले.

आमदार श्री. मल्लिकार्जुन रेड्डी, प्राचार्य साहेबराव खंदारे, नगराध्यक्ष श्री. दिलीप देशमुख, सरपंच योगिता गायकवाड आणि अन्य मान्यवरांचा यांचा शाल, श्रीफळ, ग्रंथगुच्छ आणि स्मृतिचिह्न देऊन सत्कार करण्यात आला.

आमदार श्री. मल्लिकार्जुन रेड्डी यांनी देखील ''मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. तेलगूप्रमाणे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी सर्वप्रथम ठराव विधानसभेत मांडण्यासाठी आपण पुढाकार घेतल्याचे त्यांनी विशेषत्वाने नमूद केले. मला मराठी प्रांतात येवून आमदार होण्याचा बहुमान मिळाला हे मी माझे भाग्य समजतो, अशी कृतज्ञताही त्यांनी महाराष्ट्र राज्य व भाषेप्रती व्यक्त केली.''

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने संस्कृत विद्यापीठातर्फे भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयातर्फे तयार करण्यात आलेल्या संस्कृत अहवालाचे मराठी भाषांतर करण्यात आले आहे. ''परिकल्पना आणि मार्गदर्शिका – संस्कृतच्या विकासासाठी आगामी दहा वर्षातील भावी योजना '' असे शीर्षक असलेल्या या अहवालाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

महाराष्ट्रातील प्रख्यात लोकसाहित्याचे अभ्यासक, संशोधक आणि परभणी येथील प्राचार्य साहेबराव खंदारे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात मराठी आणि लोकसाहित्य तसेच संस्कृत भाषेशी असलेला बंध विविध उदाहरणांनी उलगडून दाखविला. ''मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावयाचा असेल तर तिची विविध ग्रामीण बोलीभाषांशी, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीशी असलेली नाळ तुटू नये यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शब्दकळांची समृद्धी हे बोली भाषेची श्रीमंती आहे. मोडी लिपी ही महाराष्ट्र समजून घेण्यासाठी अत्यंत आवश्यक लिपी आहे. शासनास्तरावर मराठी भाषेसाठी जे सर्जनशील उपक्रम व्हायला पाहिजे ते उपक्रम म्हणजेच बोली भाषेवरील मराठी भाषातज्ज्ञाचे

व्याख्यान, मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग इ. संस्कृत विद्यापीठाने राबविले याबद्दल त्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले. भाषेच्या पायाभूत विकासासाठी तिचा पुरातत्त्वशास्त्र आणि भाषानिर्मिती व्यवस्था शास्त्र या दोन अंगाने अभ्यास होणे आवश्यक आहे. साहित्य हे काळाच्या कसोटीवर उतरण्यासाठी वैश्विक जाणिवेचा स्पंद असणा–या साहित्याची निर्मिती झाली पाहिजे तरच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळेल असे मत त्यांनी व्यक्त केले. संस्कृत आणि मराठी यांच्या एकत्रित अभ्यासातून मराठी भाषा समृद्ध झाली आहे. हा बंध अधिक दृढ करणे आवश्यक आहे. रवींद्रनाथ टागोरांचे विधान उद्धृत करून ज्ञानेश्वर आणि एकनाथांच्या साहित्याची तसेच महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा असलेल्या जातीवरच्या ओव्यांची आणि केशवसुत, कुसुमाग्रज इ. प्रतिभावंतांच्या कवितेची उदाहरणे त्यांनी दिली. मराठी भाषेची ही भरजरी संपन्नता आणि समृद्धी नवीन पिढीने गांभीर्याने अभ्यासली पाहिजे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.''

